स्थलप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

# गांधी-गीता

अथवा

## विसाव्या शतकांतला श्रीकृष्णार्जुनसंवाद.

मराठी ग्रंथ
१६३२

लेखक—
वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.,
संपादक ' आनंद ', पुणें.

RLEBK-0001632

१९१९.

किंमत ५ आणे.

मुद्रक व प्रकाशक
गोपाळ बळवंत जोशी, 'आनंद' छापखाना,
३२० सदाशिव पेठ, पुणें शहर.


# अनुक्रमणिका.


| अध्याय. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ | उपोद्घात ... . ... . . | १ |
| २ | स्वराज्यप्राप्तीची इच्छा... .. .. | ६ |
| ३ | स्वराज्य म्हणजे काय?... ... ... | १२ |
| ४ | हिंदु व मुसलमान . ... . | १७ |
| ५ | नेमस्त आणि जहाल . | १९ |
| ६ | उन्नतीची गुरुकिल्ली . . | २२ |
| ७ | विद्यार्थी आणि देशसेवा . ... | २७ |
| ८ | प्रस्तुतचा युगधर्म . . | ३१ |
| ९ | धर्म आणि धर्मशिक्षण. . . | ३५ |
| १० | पाश्चात्य सुधारणा ... . ... | ३९ |
| ११ | पाश्चात्य सुधारणेचे दुष्परिणाम.. | ४३ |
| १२ | भारतीय सुधारणा . . | ४९ |
| १३ | जातिभेद .. . . | ५३ |
| १४ | अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न ... | ५६ |
| १५ | देशीभाषा विरुद्ध इंग्रजी भाषा... . | ५८ |
| १६ | सत्याग्रह ... . .. | ६८ |
| १७ | हिंदुस्थानचें दारिद्र्य . ... | ८१ |
| १८ | स्वदेशी . . | ८७ |

## ‘आनंद’ कर्ते आपटे यांचीं नवीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | सौंदर्य आणि ललितकला (सचित्र) | १—०—० |
| २ | अरविंद बाबूंचीं आपल्या पत्नीस पत्रें | ०—३—० |
| ३ | मराठी-बंगाली शिक्षक (दु. आ.) | १—४—० |
| ४ | नाट्यरूप भारतवर्ष ... ... | १—०—० |

RFFBK-0001632



महात्मा गांधी.

श्री

# गांधी-गीता

## अथवा

## विसाव्या शतकांतला श्रीकृष्णार्जुनसंवाद.

## अध्याय पहिला.

### उपोद्घात.

विसाव्या शतकाचा प्रथम चरण अर्धा अधिक पार पडला आहे; युरोपांतल्या रणभूमीवर असंख्य माणसाच्या रक्ताचे पाट वाहणें थांबलें आहे, सदर युद्धासाठीं जमा झालेले सैनिक आपापल्या घरची वाट धरण्याच्या वेळेची मोठ्या उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत आहेत; अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन यांनीं जगांत यापुढें दीर्घकाळपर्यंत शांतता नांदावी या हेतूनें राष्ट्र-संघ स्थापन करण्याची अचाट बुद्धीनें काढलेली कल्पना

सर्व आबालवृद्धांच्या चर्चेचा विषय होऊन बसली आहे. या राष्ट्रसंघाच्या हातून पतित दशेंतून आपला उद्धार होईल, आणि स्वयनिर्णयाचें तत्त्व आपल्या देशास लागू करून राष्ट्रसंघ आपणांस मोठ्या प्रमाणांत स्वातंत्र्यसुखाचा लाभ करून देईल अशा आशाळभूतपणानें हिंदुस्थानासारखीं लहान लहान व परवश राष्ट्रें राष्ट्रसंघाच्या उद्देशपत्रिकेंतल्या एकेका शब्दाच्या अर्थाचा कीस काढण्यांत गुतलीं आहेत, या महायुद्धांत हिंदुस्थानानें ब्रिटिशसाम्राज्याची जी बहुमोल सेवा केली तिची प्रशंसा ब्रिटिश मुत्सद्दी मुक्तकंठानें करीत असलेले पाहून हिंदुस्थानासाठीं स्वराज्याची मागणी करणाऱ्या नेमस्त व जहाल अशा दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांना हिंदुस्थानाला स्वराज्याचा संबंध हक्क एकदम प्राप्त न झाला तरी त्याचा बराच मोठा अंश प्राप्त होईल अशी खात्री वाटू लागून गेल्या पसतीस वर्षांत हिंदुस्थानच्या राजकीय उद्धारासाठीं केलेले परिश्रम बऱ्याच अंशानें सफळ होण्याचा समय आता दिसू लागला आहे, हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. माँटेग्यु यानीं ता. २० आगस्ट १९१७ रोजीं पार्लमेंटच्या संमतीने जे आश्वासन दिलें, त्यानें सर्वांचीं अंतःकरणें प्रफुल्लित करून सोडलीं आहेत, अशा उत्कंठेच्या वेळीं हिंदुस्थानचे लोक जिची चातकाप्रमाणें वाट पाहत होते ती माँटेग्यु-चेम्सफोर्ड योजना प्रसिद्ध झाली, आणि एकाएकीं वज्राघात व्हावा तसा कित्येकांच्या मनावर तिचा परिणाम घडला. बाल-अश्वत्थामा यानें आईजवळ दूध मागितलें असतां तें

त्यास न देता पिठाचें पाणी देऊन तिनें मुलाचें समाधान करण्याचा जसा प्रयत्न केला तसा प्रकार झाला. ही योजना हिंदुस्थानांत ऱ्याच जणांना निराशाजनक वाटली; नेमस्त पक्षानें जरी तिचें अभिनंदन केलें तरी अनेक ठळक बाबतींत ती अगदीं अपुरी आहे व हें व्यंग भरून काढिल्याशिवाय हिंदुस्थानचें समाधान होणार नाहीं असेंच मत जाहिर केलें. सदर योजनेच्या मागून सुधारणा बिलाचा खर्डा प्रसिद्ध झाला. त्यांत त्या योजनेइतकेंहि पुढें पाऊल पडलेलें दिसलें नाहीं. सारांश, कमज्यास्त मानानें सर्वत्र निराशेचीच छाया दिसू लागली. तशांत लॉर्ड सिडनहाम यांनीं येवढाहि राजकीय हक्काचा तुकडा हिंदुस्थानच्या पदरांत न पडू देण्यासाठीं विलायतेंत एक संस्था स्थापून तिच्या द्वारें जंगी खटपट चालविली, तेव्हां तर लोकांची निराशा अधिकच तीव्र झाली, आणि 'अभागी हिंदुस्थान' असे दुःखावेगाचे उद्गार उत्साही आणि राष्ट्रकार्यासाठीं तनमनधन अर्पण करण्यास तयार असलेल्या तरुणांच्या तोंडून निघूं लागले.

अशा तरुणांपैकीं एकजण कपाळावर हात देऊन बसला होता. मनांतल्या उद्विग्नतेचें चिन्ह त्याच्या चर्येवर अगदीं स्पष्ट दिसत होतें, आणि कानडा, आस्ट्रेलिया यांच्यासारखें स्वराज्याचें सुख भोगण्याचें हिंदुस्थानच्या भवितव्यतेंत नाहीं असे काळें कुट्ट चित्र कल्पनेनें डोळ्यासमोर उभें केलेले पाहून त्याला नेत्रशूळासारख्या तीव्र वेदना होत होत्या. अशा वेळीं महात्मा गांधी यांची स्वारी तेथें अचानक आली

आणि म्हणाली, ‘ माझ्या तरुण बाधवा, तू असा खिन्न-वदन कां दिसतोस ? तुला कोणतें दुःख छळीत आहे तें सांग. माझ्या हातून त्याचें निवारण होणें शक्य असल्यास मी यथाशक्ति अवश्य खटपट करीन. ’

महात्म्याचे हे प्रेमळ आणि प्रोत्साहन देणारे शब्द त्या तरुणाला अमृतसजीवनीसारखे वाटले, आणि त्याने महात्माजींच्या चरणी लोटांगण घालून नम्र वृत्तीनें पण मोकळ्या मनानें आपलें दुःख निवेदन केलें.

महात्माजीनें त्याचें साग्र भाषण एकचित्तानें व शांतपणानें ऐकून घेतल्यावर म्हटलें, ‘ मित्रा, ऊठ. तुझ्यासारख्या तरुणाला असा नामर्दपणा शोभत नाहीं. अरे, देशाच्या उद्धाराची सगळी भिस्त तरुणपिढीवरच नेहमीं असते. ती आमची तरुण पिढी जर नाउमेद होऊन तुझ्यासारखी हात-पाय गाळू लागली तर हिंदुस्थानच्या भाग्योदयाची केव्हाच आशा करायला नको. देशोन्नतीच्या मार्गावर कधींहि गुलाबाचीं फुलें पसरून ठेविलेलीं नसतात. तो मार्ग अत्यंत बिकट, कष्टप्रद आणि वेळोवेळीं मनाला निरुत्साह करणाराच असावयाचा. अशा मार्गानें जाऊनच अखेर उन्नतीचा गड जिंकावा लागतो. आपल्या आर्यपूर्वजांनीं कधींहि न आचरिलेल्या, अधोगतीला नेणाऱ्या, आणि दुष्कीर्तिकारक अशा कुतर्कांनीं तुझें मन कसें व्याप्त झालें याचें मला आश्चर्य वाटतें. असला दुबळेपणा खऱ्या आर्याला शोभत नाहीं. तुम्हीं तरुणानीं ‘ लाथ मारू तेथें पाणी काढू ’ अशी उमेद

नेहमीं ठेविली पाहिजे. तुमच्या जिवावर तर हिंदुस्थानच्या उद्धाराची सगळी उमेद अवलबून आहे. नाउमेद होण्याला तरी असें कोणतें योग्य कारण आहे? श्रीभगवान् गीतेंत म्हणतात कीं ' उद्धरेदात्मनात्मान, ' म्हणजे ज्याचा उद्धार त्यानेंच स्वत. करून घेतला पाहिजे. माटेग्युसाहेब तुम्हाला काय देणार व तुम्ही काय घेणार? तुमचा उद्धार तुमच्याच हातांत आहे या भगवताच्या वचनावर पूर्ण श्रद्धा ठेवून उद्योगाला लागा, म्हणजे परमेश्वर तुम्हाला यश देईलच देईल. तुमचें मन ज्या सशयपिशाचानें पछाडलें आहे त्याला प्रथम घालवून द्या; आत्मश्रद्धेची कास धरा; आत्मिक तेज मलिन होऊ देऊ नका; म्हणजे तुमचें इच्छित तुम्हाला खात्रीनें प्राप्त होईल.'

महात्माजींचें हें प्रोत्साहनपर भाषण ऐकून तरुणाची वृत्ति पालटलेली दिसली. तथापि तो म्हणाला, ' महात्मन्, माझें मन सशयपिशाचिकेने ग्रासिलें आहे हें आपण बरोबर जाणिलें. माझ्या मनांतल्या शकाचें निरसन झाल्याखेरीज आपल्या नुसत्या आश्वासनानें माझ्या मनाचें समाधान होणार नाहीं. यासाठीं माझ्यावर दया करून माझ्या शकांची आपण निवृत्ति करावी अशी माझी विनति आहे. '

महात्मा म्हणाले ' फार उत्तम आहे. तुमच्या काय शका असतील त्या मोकळ्या मनानें मला सांगा. '

हे शब्द ऐकुन तरुणाला आपल्या निराश झालेल्या अतःकरणावर अमृत सिंचन केल्याइतकें सुख वाटलें, आणि त्यानें आपल्या शका क्रमाक्रमानें महात्माजीपुढें मांडिल्या.

# अध्याय दुसरा.

## स्वराज्यप्राप्तीची इच्छा.

तरुण म्हणाला—'माझ्या शंका वेड्यावाकड्या व मूर्ख-पणाच्या असतील; पण आपण त्याबद्दल क्षमा करून मी विचारीन त्या प्रश्नाचें उत्तर देऊन माझें समाधान करावें येवढीच माझी नम्र विनति आहे. माझा पहिला प्रश्न हा कीं हिंदुस्थानच्या लोकात गेल्या पांच सहा वर्षांतच स्वराज्यप्राप्तीची आकांक्षा उत्पन्न झाली आहे. हीच जर तीस पसतीस वर्षांपूर्वी राष्ट्रीय सभेचा जन्म झाला, तेव्हा त्या सभेच्या चालकांनीं लोकामध्यें उत्पन्न केली असती आणि त्या दिशेनें प्रयत्न चालविले असते तर आतापर्यंत केवढें तरी कार्य झालें असतें! पण राष्ट्रीय सभेचे चालक त्यावेळीं ह्यूम, वेडरबर्नप्रभृति इंग्रज लोकांच्या कच्छपीं लागले. या इंग्रज लोकांना हिंदुस्थानच्या हिताची कळकळ कशी वाटावी? हिंदुस्थानांत इंग्रजांचाच अमल सतत राहावा अशीच त्यांची स्वाभाविक इच्छा असावयाची. ही गोष्ट अलीकडे लोकांच्या लक्षांत जसजशी येऊ लागली तसतशी राष्ट्रीय सभेच्या धोरणा-विषयीं लोकांत अप्रीति उत्पन्न होऊन त्यांनीं आतां 'स्वराज्य-प्राप्ति' हें राष्ट्रीय सभेचें धोरण नक्की ठरवून टाकिलें आहे. याविषयीं आपलें काय म्हणणें आहे?

महात्मा—हें तुमचें मत चुकीचें आहे इतकेंच नाहीं, तर अत्यंत अनुदारपणाचेंहि आहे. तुम्ही मि. ह्यूम व सर वि. वेडरबर्न याचे लेख व भाषणें न वाचता व त्याच्या चरित्राची खरी माहिती न मिळवितांच आपलें मत ठरविलेलें दिसतें. स्वराज्यप्राप्तीची आकांक्षा गेल्या पांच सहा वर्षांतच उत्पन्न झालेली नाहीं. काँग्रेसच्या जन्माबरोबरच ती प्रकट झालेली आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत हिंदी लोकांचा हात असावा अशी मागणी कांग्रेस आरंभापासून करीत आली आहे, व ही मागणी करण्यास ह्यूम, वेडरबर्नप्रभृति इंग्रजांनींच आपणास शिकविलें. इतकेंच नाहीं, तर त्यासाठीं स्वज्ञातिबांधवाकडून होणारा उपहास त्यांनीं सोसला, व वेळोवेळीं द्रव्यसाह्यहि केलें. त्यांच्या उपकाराची फेड अशा निंदाव्यंजक शब्दांनीं करणें तुमच्यासारख्या सुशिक्षित म्हणविणाराना शोभतें काय याचा तुम्हीच विचार करा. स्वराज्याची मागणी आतां अधिक जोरानें होऊं लागली आहे ही गोष्ट खरी; पण त्या मागणीचा उगम राष्ट्रीयसभा हाच आहे. मागच्या काळातल्या राष्ट्रीयसभेच्या हिंदी पुढाऱ्याविषयींहि तुमचें मत असेंच चुकीचें आहे. मि. दादाभाई, प्रो. गोखले, बद्रुद्दिन तय्यबजीप्रभृति हिंदी पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानविषयक प्रश्नाचें परिश्रमपूर्वक अध्ययन करून केवढें तरी राजकीय वाङ्मय तयार करून ठेविलें आहे! त्यांनीं मिळविलेल्या माहितीच्या आधारावर तुम्हाला आतां स्वराज्याची मागणी करणें सुलभ झालें आहे; म्हणजे स्वराज्याच्या

मागणीचा पाया वस्तुतः या पुढाऱ्यांनीं घातला आहे ही गोष्ट तुम्ही विसरता, आणि त्याच्याविषयीं अविचारानें अद्वातद्वा बोलतां हें तुम्हास खरोखर लाञ्छनास्पद आहे. दादाभाई व गोखले यांनीं आपला सारा जन्म देशसेवेंत घालविला. स्वराज्याच्या मागणीला त्यांच्या वेळीं नुकता प्रारंभ झाला होता. फळ प्राप्त होण्यापूर्वी जमीनीची मशागत करावी लागते व तें काम अतिशय कष्टाचें असतें. तें काम त्यांनीं अनेक अडचणी सोसून मोठ्या हौसेनें केलें. त्याबद्दल त्यांना नांवें ठेवणें हाच मोबदला तुम्ही देणार काय?

तरुण—पण हे पुढारी इंग्रजाच्या न्यायप्रियतेवर विसंबून राहिले, व त्यामुळे स्वराज्यप्राप्ति दिरंगाईवर पडली. स्वराज्यप्राप्तीच्या कामीं इंग्रज लोकांचा पाठिंबा मिळविण्यात त्यांनीं नाहक दिवस घालविले. इंग्रजलोक हिंदुस्थानासंबंधानें न्यायानें वागतील अशी त्यांची समजूत झाली ती चुकीची होती असें मला वाटतें.

महात्मा—सगळे इंग्रज तेवढे येथून तेथून मतलबी अशी तुमची समजूत झालेली दिसते. तीच मुळीं चुकीची आहे. इंग्रजांतहि पुष्कळ उदार मताचे, न्यायप्रिय आणि पतितांचा उद्धार करण्यासाठीं सर्वस्व अर्पण करणारे आहेत. तुम्हांला न्याय पाहिजे आहे तर तुम्हीहि दुसऱ्याविषयीं मत ठरवितांना न्यायबुद्धि ठेविली पाहिजे. इंग्रजांचा पाठिंबा मिळविल्याशिवाय हिंदुस्थानला न्याय मिळणार नाहीं असें त्यांना

वाटलें तें अगदीं योग्य होतें. मागच्या पुढाऱ्यांना नावें ठेव- णारे तुमच्यासारखे स्वराज्यवादी देखील आज काय करीत आहेत? मजूरपक्षाचा पाठिंबा मिळविण्याचा यत्न ते करीत नाहींत काय?

**तरुण**—स्वराज्याच्या मागणीचा पाया राष्ट्रीय सभेनें फार वर्षांपूर्वी घातला आहे असें आपण म्हणालां, तें कसें? ' स्व- राज्य ' किंवा ' होमरूल ' हे शब्द तर पूर्वींच्या काँग्रेसच्या रिपोर्टांतून कोठेंच आढळत नाहींत !

**महात्मा**—तुम्ही नुसते शब्दावर दृष्टि देणारे दिसतां. स्व- राज्य किंवा होमरूल हे शब्द अलीकडे पांच सहा वर्षांतच हिंदुस्थानासंबधानें प्रचारांत आले, यावरून स्वराज्यप्राप्तीसाठीं राष्ट्रीय सभेनें पूर्वीं कांहीं खटपट केली नाहीं, किंबहुना तें तिचें ध्येयच नव्हतें, अशी चुकीची समजूत तुम्हीं करून घेतली आहे. पण खरा प्रकार तसा नाहीं हें मी आतां स्पष्ट करून दाखवितों. स्वराज्याची मागणी एका प्रांतानें किंवा एका जातीनें करून कांहीं उपयोग नव्हता. त्या मागणीला सग ळ्या राष्ट्राचा पाठिंबा पाहिजे होता. तो पाठिंबा मिळविण्या- साठीं अगोदर हिंदुस्थानच्या सगळ्या लोकांत एकराष्ट्रीय- त्वाची भावना उत्पन्न व्हावयास पाहिजे होती. ती भावना कोणीं उत्पन्न केली? राष्ट्रीय सभेनेंच ना? दुसरी गोष्ट— स्वराज्याच्या हक्कांतला मुख्य भाग म्हणजे देशाचें उत्पन्न व खर्च यांच्यावर लोकांचा ताबा असणें हा आहे. तो ताबा

हिंदुस्थानच्या लोकांना मिळावा अशी मागणी राष्ट्रीय सभा कित्येक वर्षांपासून करीत आली आहे. हिंदुस्थानच्या राज्य-कारभारातल्या मोठाल्या हुद्याच्या जागा सत्पात्र हिंदी लोकाना मिळाल्या पाहिजेत असा त्या सभेचा पूर्वीपासून आग्रह आहे. स्वराज्याचा ' ओनामा ' तरी घालून द्या असा याचा अर्थ होत नाहीं काय? राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करणे ही काँग्रेसची एकच कामगिरी घेतली तरीसुद्धा ती इतकी महत्त्वाची आहे कीं तिच्याबद्दल सर्व हिंदी लोकाना खरोखर अभिमान वाटला पाहिजे. स्वराज्याच्या मागणीच्या यशस्वितेच्या मार्गांतले काटे त्यामुळें दूर होऊन तुमच्या-सारख्या स्वराज्यवाद्याचें काम त्यामुळें फार सुकर झालें आहे ही गोष्ट काँग्रेसला नांवें ठेवताना तुम्ही विसरतां हें आश्चर्य आहे. हें पक्कें ध्यानात ठेवा कीं ज्याना आपल्या वाडवडिलांविषयीं आदर वाटत नाहीं, त्याच्या हातून कोणतेंही सत्कृत्य केव्हांहि घडण्याचा फारसा संभव नाहीं. पूर्वीच्या पुढाऱ्यानीं तत्का-लीन परिस्थितीप्रमाणें राजकारणी चळवळ सुरू केली, तिच्या साठीं अनेक कष्ट सोसले, व स्वार्थत्याग केला; म्हणून आज तुम्हाला एक पायरी वर चढण्याचें सामर्थ्य आलें. त्यानीं पूर्वी तयारी करून ठेविली नसती, तर तुम्हाला आज येवढी उडी मारणें शक्य झालें नसतें. पुढच्यानीं मागच्यांस नांवें ठेवावयाचीं असा क्रम सुरू राहिला, तर तुमचे नातू पणतू तुम्हाला सुद्धां अशींच नावें ठेवतील. माझी तुम्हांला प्रेम-

पूर्वक अशी विनंति आहे कीं पूर्वीच्या पुढाऱ्यांविषयीं तुम्ही स्वत. अनादराचे उद्गार काढूं नयेत इतकेंच नाहीं, तर दुसरे कोणी काढीत असले, तर त्यांची समजूत घालून बहकलेल्यांना ताळ्यावर आणणें हें सुद्धां तुम्ही आपलें कर्तव्य समजा. प्रो. गोखले यांच्यासारखे पुढारी स्वराज्याचा पाया घालणारे व त्याचे आधारस्तंभ होते. कांहीं बाबतींत त्यांचे विचार तुमच्या विचाराहून भिन्न असतील, पण आपले विचार तेवढे बिनचूक व सत्य, आणि दुसऱ्याचे विचार चुकीचे व ते देशाचे शत्रु असें समजणें ही सवय फार घातक आहे.

# अध्याय तिसरा.

## स्वराज्य म्हणजे काय?

**तरुण**—पूर्वीच्या कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं स्वराज्याचा पाया घातला असें आपण मघा सांगितलें. त्यावरून स्वराज्याविषयींचें आपलें मत अधिक विस्तृतपणें ऐकण्याची मला उत्कंठा झाली आहे. ती आपण कृपा करून पूर्ण कराल काय?

**महात्मा**—हा विषय शांतपणानें स्वतःच्या मनाशीं विचार करण्यासारखा आहे. स्व—राज्य म्हणजे स्वतःचें स्वतःवर राज्य असणें. व्यक्तिमात्राच्या ठायीं हें स्वराज्य असणें—इंद्रियांना वश राखता येणें—अवश्य आहे. यानंतरची पायरी म्हणजे कुटुंबांतलें स्वराज्य. यांत कुटुंबांतल्या सर्व जाणत्या मंडळीनें एका विचारानें चालणें, आणि एकट्या दुकट्याच्या हिताचा विचार न करतां सगळ्या कुटुंबाच्या हिताच्या गोष्टी करणें, या गोष्टी येतात. त्याच्या पुढें जात, जातीच्या पुढें शहर, शहरापुढें प्रांत आणि प्रांताच्या पुढें राष्ट्र अशा पायऱ्या आहेत. स्वराज्य शब्दाचा जो अर्थ सामान्यतः समजला जातो त्याला प्रारंभ गांवाच्या व्यवस्थेपासून होतो. म्हणून त्या व्यवस्थेला स्थानिक स्वराज्य अथवा लोकल सेल्फ गवर्नमेंट असें नांव पडलें आहे. गांवाची उत्तम व्यवस्था राखतां येणें ही मोठ्या म्हणजे राष्ट्रीय स्वराज्याची अर्थात् गुरुकिल्ली

आहे. ती व्यवस्था आपल्या हातून नीट ठेविली गेली नाहीं तर स्वराज्याची आपल्याला काहींच किंमत कळली नाहीं असें म्हणावें लागेल.

तरुण—गावाची आरोग्य, शिक्षण वगैरे बाबतींत समाधानकारक व्यवस्था फारच थोड्या लोकांकडून हल्लीं ठेविली जात आहे ही अत्यंत खेदाची गोष्ट कबूल करण्याखेरीज गत्यंतर नाहीं. पण स्थानिक स्वराज्यात अजून आम्ही आपलें कर्तृत्व विशेषसें दाखविलें नाहीं, म्हणून राष्ट्रीय स्वराज्याचे हक्क मागण्यास आम्ही पात्र नाहीं, असें आपलें म्हणणें आहे काय?

महात्मा—छेः छेः! तसें मी म्हणतच नाहीं. माझ्या दृष्टीनें स्वराज्य भोगण्यास आपण आज सुद्धा पात्रच आहों. कारण, स्वराज्य म्हणजे चुक्या करण्याची मोकळीक व त्या सुधारण्याची सत्ता असेंच मुळीं माझें मत आहे. आम्हांला चुक्या करण्याची मुभाच ठेविली नाहीं, तर त्या सुधाराव्या कशा याचें ज्ञान तरी आम्हास कसें व्हावें! मुलाला अर्भकावस्थेंत मांडीवर अडवें निजवून चमच्या चमच्यानें दूध त्याच्या घशांत सोडणें हें ठीक आहे, पण तेंच मूल मोठें झालें तरी त्याच्या आईनें तोच क्रम सुरू ठेविला तर त्यानें मुलाची तृप्ति व्हावयाची नाहीं आणि त्याला स्वतः हातात दुधाची वाटी घेऊन दूध पिण्याचें सामर्थ्यहि येणार नाहीं.

तरुण—कित्येक इंग्रज टीकाकार असा आक्षेप घेतात कीं स्वराज्याची चळवळ ही इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकून देण्याची चळवळ आहे. याला आपण काय उत्तर द्याल?

महात्मा—याला मी असे उत्तर देईन कीं ' बाबांनो, ही तुमची अत्यंत भ्रामक समजूत आहे. आम्हाला अजून पुष्कळ गोष्टी इंग्रजांपासून शिकावयाच्या आहेत. त्याकरितां तरी त्यांची संगति आम्हास अवश्य पाहिजे आहे. ब्रिटिश साम्राज्यातून फुटून बाहेर पडण्याची गोष्ट आमच्या ध्यानीं मनींसुद्धा नाहीं. ब्रिटिश निशाणाखालीं राहूनच आम्हाला कानडासारखें स्वराज्य भोगावयास हवें आहे. आमच्या भावी स्वराज्यांत इंग्रजांनाहि त्यांच्या योग्यतेप्रमाणें स्थान अवश्य मिळेल. त्यांनीं आमच्याशीं सहकारिता ठेवून भारतीय स्वराज्याचा कारभार सुरळीतपणें चालण्यास मदत करावी असें आम्ही म्हणतों. अर्थात् त्याना हाकून देण्याचा प्रश्नच राहत नाहीं.

तरुण—इंग्रज टीकाकारांचा दुसरा आक्षेप असा आहे कीं हिंदी लोकांच्या अंगीं स्वतःच्या देशाचें परचक्रापासून रक्षण करण्याचें सामर्थ्य नाहीं. अर्थात् पूर्ण स्वराज्य त्यांना मिळालें तरी त्यांच्यानें तें राखवणार नाहीं. एवंच हिंदी लोक स्वराज्याच्या अधिकारास पात्र नाहींत. यावर आपल्यापाशीं काय उत्तर आहे ?

महात्मा—हा आक्षेप जितका हास्यास्पद तितकाच दुःखदहि आहे. हास्यास्पद अशासाठीं कीं भावी भारतीय स्वराज्यात इंग्रजांनाहि भागीदार होण्याचा हक्क ठेविला आहे हें ठाऊक असून असा आक्षेप करण्यांत येतो ! भारतीय स्वराज्याच्या रक्षणाचा भार त्यातल्या प्रत्येक व्यक्तीवर—मग तो हिंदु असो, मुसलमान असो, किंवा इंग्रज असो—सारखाच

पडणार आहे. अनुभवानें जर असें दिसून आलें कीं हिंदु किंवा मुसलमान, किंवा यहुदी, पठाण वगैरे जाती शिपाई-गिरी किंवा आरमारातली नोकरी करण्यास अपात्र आहेत, व इंग्रज लोकाची पात्रता विशेष आहे, तर स्वराज्याच्या हितासाठीं सैन्यांतल्या व आरमारातल्या सगळ्या ठळक ठळक जागा स्वराज्याचे जबाबदार चालक इंग्रजानाच देतील. म्हणजे आज आहे अशीच जवळ जवळ स्थिति तेव्हाहि राहून इंग्रजाना कुरकुरण्याला काहींच कारण उरणार नाहीं. सदर आक्षेप दुःखद आहे असें मीं म्हटलें याचें कारण हिंदी लोक शिपाईगिरीच्या कामात नादान व कच्चे आहेत अशी मनाची खोटी समजूत करून घेतल्यामुळें सरकारनें हिंदी लोकाना निःशस्त्र करून त्यांना आजपर्यंत लष्करी शिक्षण मिळू दिलें नाहीं. त्याचा परिणाम हा झाला कीं परवाच्या युद्धाच्या वेळीं घाईघाईनें पलटणी तयार करून रणभूमीवर पाठवाव्या लागल्या.

तरुण—तरी पण फ्रान्सच्या आणि मेसोपोटेमियाच्या रण-क्षेत्रावर हिंदी शिपायानीं मोठी बहादुरी करून व्हिक्टोरिया क्रॉससारखे सन्मानाचे चांद आणि ब्रिटिश सेनापतीकडून प्रशंसेचे उद्गार मिळविले.

महात्मा—होय, तें खरें आहे. तथापि हे लढणारे हिंदी शिपाई सुशिक्षित नव्हते. त्यामुळें साम्राज्याभिमानासारख्या उच्च भावनांनीं त्यांचें अंतःकरण उचमळलें नव्हतें. ते लढले ते केवळ ज्याची भाकरी खावी त्याची इमानानें चाकरी

करावी येवढ्याच भावनेनें. तिला जर साम्राज्याभिमानासारख्या उच्च भावनेची जोड मिळती तर याहूनहि अधिक चांगली कामगिरी त्यांना बजावता आली असती.

**तरुण**--आपण मूळचा स्वराज्याचा मुद्दा सोडून हें थोडें विषयांतर केलें आहे. मलाहि या विषयासंबधानें आपणास फारसें कांहीं विचारावयाचें उरलें नाहीं. तथापि एकच गोष्ट विचारतों. ती ही कीं आमची स्वराज्याची मागणी सफळ केव्हां होईल ?

**महात्मा**—खरें पुसाल तर ब्रिटिश प्रजेपाशीं रडगाणें गाइल्यानें स्वराज्य मिळणार नाहीं. त्या मागणीच्या पाठीशीं हिंदी प्रजेचा नैतिक जोर पाहिजे. जेव्हा हिंदुस्थानातले एकूण एक लोक स्वराज्य म्हणजे काय तें जाणतील, व त्या संबधानें आपापलीं कर्तव्यें निमूटपणें करू लागतील, तेव्हा स्वराज्य तुमच्या घरीं चालत येईल हल्लीं ज्या त्या गोष्टी साठीं सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची खोड आम्हाला लागली आहे ती वाईट आ` आम्हाला करता येण्यासारखीं कामेंसुद्धा आम्ही सरकारवर सोंपवून स्वस्थ असतों. आरोग्य, शिक्षण, प्रेमक्यापसी व्यवस्था, पचायती, यासारख्या गोष्टींत आम्हाला स्वतःला पुष्कळ करतां येण्यासारखें आहे. तें जोंपर्यंत आम्ही करणार नाहीं, तोंपर्यंत स्वराज्यप्राप्तीचा काळ दूर आहे असें म्हटलें पाहिजे. यदाकदाचित् अशा स्थितींतहि आम्हांस स्वराज्य मिळालें, तरी कर्तव्यजागृति झाल्याशिवाय तें टिकणार नाहीं हें खूप समजावें.

# अध्याय चौथा.

## हिंदु व मुसलमान.

तरुण—पुष्कळ इंग्रज लोक म्हणतात कीं जोंपर्यंत हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान याच्यासारख्या परस्परांशीं हाडवैर ठेवणाऱ्या जाति आहेत, तोंपर्यंत ह्या देशाचें एक राष्ट्र होणें शक्यच नाहीं. यावर आपण काय उत्तर देता ?

महात्मा—हें सब झूट आहे. हिंदु व मुसलमान या दोघांचा धर्म निराळा आहे इतकेंच. हाडवैर तर आज मुळींच नाहीं व ज्या वेळीं हिंदूच्या व मुसलमानाच्या दोघांच्याहि हातात स्वतंत्र सत्ता होती त्यावेळींहि नव्हतें. मुसलमानाच्या राज्यात हिंदु व हिंदूच्या राज्यात मुसलमान सुखासमाधानानें नादत, इतकेच नाहीं, तर अधिकाराच्या मोठाल्या जागावरहि नेमिले जात. इतिहास या गोष्टीला साक्षीदार आहे. क्वचित् एखादेवेळीं कांहीं माथेफिरूनीं मारामाऱ्या केल्या म्हणून त्या जातींमध्ये हाडवैर आहे असें कसें म्हणतां येईल? पुष्कळसे मुसलमान मूळचे हिंदुच आहेत. आपल्या व त्याच्या अंगात एकच रक्त खेळत आहे. धर्म बदलला म्हणून कांहीं ईश्वर बदलला नाहीं, देश बदलला नाहीं, मातृभूमीवरचें प्रेम, किंवा परस्पर—बंधुत्व नाहींसें झालें नाहीं. हिंदु व मुसलमान दोघे भाऊभाऊच आहेत. कांहीं वेळ ते भांडले तरी

पुनः एक होतील. काँग्रेसमध्यें मोठा भरणा हिंदूंचा आहे, आणि मॉस्लेम लीगमध्यें सगळे मुसलमान आहेत; पण राष्ट्र हिताच्या बाबतींत दोघानींहि सुज्ञपणा दाखवून एकमत केलें कीं नाहीं? हिंदुस्थानच्या हितशत्रूंना त्याच्यामधल्या किरकोळ भांडणास 'हाडवैर' असें नांव देऊन त्याचा उगाच मोठा बाऊ करून ठेविला आहे. हिंदु व मुसलमान एक झाले तर मोठा अनर्थ होईल अशी भीती त्याना वाटत आहे! हिंदु-मुसलमानात जसे धार्मिक दुराग्रहाचे पडदे आहेत तसे शैव आणि वैष्णव, किंवा सुन्नी आणि शिया याच्यासारख्या एकाच धर्मातल्या भिन्न भिन्न पंथातहि असतात. निरनिराळे धर्म व पंथ हे एकाच ठिकाणीं पोहोंचण्याचे निरनिराळे मार्ग आहेत, अशी उदारपणाची दृष्टि ठेविली म्हणजे भांडणें व मारामाऱ्या होण्याचे काहीं कारण नाहीं. तशी दृष्टि आपल्या लोकात पूर्वीं होती, म्हणून पूर्वींच्या काळीं हिंदुमुसलमानामध्यें भांडणें कधीं झालीं नाहींत. नवीन आलेल्या माणसाचा समावेश बरोबरीच्या व बंधुत्वाच्या नात्यानें आपणात करून घेण्याचा गुण पूर्वीं आपल्या देशात होता; मध्यतरीं इंग्रजाचें आपल्यावर राज्य झाल्यानतर कित्येक वर्षें तो लोपला होता. आतां पुनः तो स्थापित होत आहे ही आनदाची गोष्ट आहे.

# अध्याय पांचवा.

## नेमस्त आणि जहाल.

**तरुण**—आपल्या देशांत राजकीय बाबतींत नेमस्त आणि जहाल असे दोन पक्ष आहेत. आपलीं मतें या दोन्ही पक्षांच्या मतांहून काहींशीं निराळींच दिसतात. तेव्हा आपण आपला एक स्वतन्त्र तिसरा पक्ष स्थापन करणार आहा कीं काय?

**महात्मा**—छेः छेः! तुमचा हा तर्क चुकीचा आहे. माझ्या मनांत तसें कांहीं एक नाहीं. एकाच पक्षांतल्या सगळ्या लोकांचे विचार तरी कोठें सर्वांशीं सारखे असतात? आणखी देशसेवा करणें हेंच ज्याचें व्रत असेल त्याला पक्षाची तरी काय जरूरी आहे? मी नेमस्त आणि जहाल या दोन्ही पक्षाची सेवा करूं इच्छितों. जेथें माझे व त्याचे विचार जुळणार नाहींत, तेथें मी आपले विचार आदरपूर्वक त्यांचे पुढें मांडून सेवा करीत राहीन.

**तरुण**—दोन्ही पक्षाला तुम्ही कोणते हिताचे शब्द सांगाल?

**महात्मा**—जहालांना मी असें म्हणेन कीं 'मित्रांनो, हिंदुस्थानाला स्वराज्य मिळावें असें तुम्ही इच्छिता; पण तें तुमच्या मागण्यानें मिळेल असें मला वाटत नाहीं. तें ज्यानें

त्यानें स्वतः प्राप्त करून घेतलें पाहिजे. दुसऱ्याच्या देण्यानें स्वराज्य मिळत नसतें, दुसरा देतो तें परराज्यच असतें. तुम्हीं उद्या इंग्रजांना येथून हाकून लाविलें तरी त्यानें आम्ही स्वराज्य प्राप्त करून घेतलें असें तुम्हाला म्हणतां यावयाचें नाहीं. खरें ' स्वराज्य ' म्हणजे काय तें मीं मघा सांगितलेंच आहे. तें स्वराज्य शस्त्रबळानें कधींच मिळत नाहीं. त्याला आत्मबळ लागतें. तेव्हां आत्मबळ तुम्हीं आम्हीं प्रथम संपादन केलें पाहिजे.

नेमस्तांना मी म्हणेन कीं ' नुसते अर्ज आणि विनंत्या करणें हें मानहानि करणारें आहे. तें आपल्या हीनतेची कबूली देण्यासारखें आहे. ब्रिटिश अमलावांचून आपलें चालावयाचें नाहीं असें म्हणणें म्हणजे परमेश्वराचें प्रभुत्व नाकबूल करणें होय. या जगांत परमेश्वराची तेवढी गोष्ट खेरीज करून बाकी कोणाचें कोणावांचून अडून राहिलें आहे ? शिवाय, ज्याला सामान्य व्यवहारज्ञान आहे असा मनुष्य देखील तुम्हांला असेंच सांगेल कीं तूर्त तरी इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत असणें अवश्य आहे असें म्हटल्यानें इंग्रज लोक शेफारून जातील. आमची परस्पराशीं कलह करण्याकडे प्रवृत्तिच असली तर इंग्रजांच्या दरेकावणीनें कांहीं वेळ ती दबून राहील इतकेंच. पण संधी मिळाल्याबरोबर ती उचल खाईल.' स्वतःच्या संरक्षणासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची सवय लागल्यानें स्वतःच्या अंगांतली धमक मात्र

नाहींशी होते. कोणाचाहि—मग ते हिंदी राज्यकर्ते असोत, किंवा परकीय राज्यकर्ते असोत—जुलूम आपण आपल्यावर चालू देणार नाहीं ही गोष्ट आपणास अजून शिकावयाची व दुसऱ्यास शिकवावयाची आहे.'

मी म्हणतों याप्रमाणें जर सगळ्या गोष्टी घडून आल्या तर नेमस्त आणि जहाल यांच्यामधला वादच तुटेल असें मला वाटतें. मग त्याच्यांत परस्पराविषयीं मनांत शंका किंवा अविश्वास राहणार नाहीं.

वा. क्र. १६३२

# अध्याय सहावा.

## उन्नतीची गुरुकिल्ली.

तरुण—आतापर्यंतच्या आपल्या भाषणाचा भावार्थ मी जो समजलों तो हा आहे कीं राजकीय उन्नति ही आपली आपणच करून घेतली पाहिजे.

महात्मा—राजकीयच का? सगळ्याच उन्नतीची गुरु-किल्ली आपल्यापाशीं आहे; पण दिशाभूल झाल्यामुळें ती आपणाला दिसत नाहीं. ती शोधून काढण्याची दृष्टि यावी यासाठींच जनतेला शिक्षण पाहिजे, आणि तेंहि शुद्ध पाहिजे.

तरुण—शुद्ध शिक्षण हल्लींच्या शिक्षणाहून कांहीं निराळें आहे काय?

महात्मा—होय. माझ्या मतें हल्लींची शिक्षणपद्धति फार अशुद्ध, अपुरी व दोषयुक्त आहे. मला या संबधांत जो थोडासा अनुभव आला आहे त्यावरून हल्लींच्या शिक्षणांत मला पुढील दोष दिसतात—हल्लींची शिक्षणपद्धति आपल्या कुटुंबव्यवस्थेकडे लक्ष न देतां व पूर्व संस्कृतीचा विचार न करतां राज्यकर्त्यांनीं आपल्या तात्पुरत्या सोयीकडे पाहून बन-विली. इतिहास म्हणजे स्वदेशाभिमान शिकविण्याचें साधन. पण तो शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या इतिहासानें उत्पन्न होत नाहीं असा निदान माझा स्वतःचा तरी अनुभव आहे. तसेंच भूगोलाचें. आपल्या गावाची ज्याला माहिती नसते

असा मुलगा इंग्लंडांतल्या कौंटीजच्या नांवाची यादी घडा-घड म्हणतो! अंकगणितात आपल्या जुन्या देशी रूढीला फारच थोडा मान मिळाला आहे; शास्त्रीय विषयाचें शिक्षण केवळ पुस्तकी असतें; त्या ज्ञानाचा व्यवहारात प्रत्यक्ष हातानें कांहीं उपयोग करून दाखविण्याचें सामर्थ्य मुलांत येत नाहीं; आरोग्यशास्त्राचें शिक्षण बहुतेक नाहीं म्हटलें तरी चालेल; उद्योगधंदा असा बहुधा कोणताच शिकविला जात नाहीं; कृषिकर्माचें ज्ञान होत नाहीं; फुरसतीच्या वेळीं स्वतःच्या उपयोगासाठीं तरी एखादें वस्त्र विणूं म्हणेल तर तेंहि कळत नाहीं; क्षात्रकलेला अभ्यासक्रमात स्थान नाहीं; संगीताचा मागमूस नाहीं; देशी खेळांना जवळ जवळ हद्दपार केलें आहे; सारांश, हल्लींच्या शिक्षणपद्धतीनें मनुष्य स्वतंत्र उद्योगधंदा करण्यास असमर्थ, परावलंबी, स्वतःच्या देशाविषयीं अज्ञानी आणि देशाभिमानशून्य असा मनुष्य होतो.

**तरुण**—शिक्षण सक्तीचें पाहिजे असें पुष्कळांचे मत आहे. तुम्हांला कसें काय वाटतें?

**महात्मा**—राष्ट्रावर कोणत्याहि गोष्टीची सक्ती नसावी या मताचा मी आहें. मला वाटतें कीं एकदम लोकांवर सक्ती न करतां प्रथम शिक्षण फुकट व ऐच्छिक करून प्रयोग चालविणें हें हल्लींच्या काळीं लोकांना विशेष रुचेल. जोंपर्यंत आपण जो-हुकुमीच्या काळातून निघालों नाहीं, तोंपर्यंत शिक्षणाबद्दल सक्ती करण्यानें नव्या भानगडी उपस्थित

होण्याचा व आपल्या कार्यांत विघ्नें येण्याचा संभव आहे. मला स्वतःला निदान सक्तीच्या शिक्षणासंबंधानें प्रतिकूळ अनुभव आलेला आहे.

**तरुण**—आपल्या देशाला शिक्षणप्रसारावाचून तरणोपाय नाहीं. त्यातच आपल्या उन्नतीची सारी गुरुकिल्ली आहे असें आपण मघाशीं सांगितलें; आणि सरकारी शाळांतली शिक्षण-पद्धति कशी कुचकामाची आहे हेंहि त्याबरोबर आपण स्पष्ट केलें. मग आपणांला हितकर होईल अशा शिक्षणाचा प्रसार देशात कसा होईल? तो कोण करील?

**महात्मा**—हें काम प्रथम लोकांनींच हातीं घेऊन प्रयोग करून पाहिले पाहिजेत, आणि ते यशस्वी ठरल्यावर त्या नमुन्याच्या शाळा काढा असें सरकारास सागून त्याना त्या काढावयास लाविलें पाहिजे. लोकांनीं नमुनेदार शाळा काढ-ताना भपकेबाज इमारती बांधण्याकडे निष्कारण पैसा खर्च करू नये. जेथें सृष्टिसौंदर्याचा लाभ मिळेल, आरोग्याचें रक्षण होईल, व सुधारणेच्या मोहक नावाखालीं वडणाऱ्या तिरस्करणीय गोष्टींचा संसर्ग मुलाना लागणार नाहीं अशा ठिकाणीं सुशिक्षित, अनुभवी व नीतिमान् शिक्षकाचे हातीं शिक्षणाचें काम द्यावें. अशा शिक्षकाना दुप्पट पगार द्यावा लागला तरी हरकत नाहीं. त्यांनीं नुसतें प्राथमिक शिक्षण जरी निर्दोष रीतीनें तुर्त दिले तरी त्यापासून महत्त्वाचे परिणाम घडून येतील.

तरुण—पण हें काम करावयाचें कोणीं? आणि त्याला पैसा कोठून आणावयाचा?

महात्मा—कोणीं म्हणजे? आपल्या सुशिक्षितांनीं. आणि पैशाविषयीं म्हणाल तर तोहि लोकांनींच पुरविला पाहिजे. या कामीं अमेरिकेचा कित्ता घेण्यासारखा आहे. तेथील शिक्षणसंस्था एका ट्रस्टच्या द्वारें चालतात. शिक्षणाचें देशोन्नतीच्या कामीं फार मोठें साह्य होतें हें जाणून अमेरिकन लक्ष्मीपुत्रांनीं लक्षावधि रुपयाच्या रकमा या ट्रस्टच्या स्वाधीन केल्या आहेत. या ट्रस्टने पसंत केलेल्या पद्धतीनें चालणाऱ्या शिक्षणसंस्थांना या फंडातून मदत होते. या शिक्षणसंस्था पुस्तकी ज्ञानच देणाऱ्या नसतात. त्या उद्योगधंद्याचेंहि शिक्षण देतात. उदाहरणार्थ, अमेरिकन शेतकऱ्यांना शास्त्रीय पद्धतीचें कृषिकर्मविद्येचें शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. हिंदुस्थानच्या शेतकऱ्यासाठीं अशा शाळा निघतील तर केवढें कार्य होईल! सरकारानेंच प्रत्येक गोष्ट करण्याची अपेक्षा करीत बसून शेवटीं कांहीं न घडण्यापेक्षा आमचे लोकांनीं स्वावलंबी होऊन अशा शिक्षणसंस्था आपल्या आपणच काढल्या पाहिजेत. धनिक लोकांनीं आपल्या द्रव्याचा कांहीं अंश धर्मकृत्य म्हणून या कार्याला अर्पण केला पाहिजे. ज्याच्यापाशीं धन नाहीं पण विद्या आहे, त्यांनीं आपला काळ शिक्षणप्रसाराच्या कार्याला धर्मार्थ म्हणून—कर्तव्य समजून—दिला पाहिजे, आपल्या लोकांत अजून

दानधर्म करण्याविषयींची प्रवृत्ति जागृत आहे. तिचा ओघ हरप्रयत्नानें या कार्याकडे वळविण्याची जोराची खटपट केल्यास आपणास यश येणार नाहीं असें मला वाटत नाहीं. एक शिक्षणप्रसाराचें कार्य झालें तर त्याच्या पोटीं अनेक कार्यें आपणास सत्वर साधता येतील.

**तरुण**—पण धनिक लोक बहुधा शकेखोर असतात. त्याचें मन वळविण्याचें काम फार कठीण आहे. तें कसें व्हावें ?

**महात्मा**—होय. तुम्ही म्हणतां तें खरें आहे, आणि मला वाटतें त्याचीं मनें शकेखोर बनविल्याबद्दलची पुष्कळशी जबाबदारी आपल्यावरच येते. त्यानीं अनेक वेळा पूर्वी आपल्या विश्वासावर मोठाल्या रकमा सत्कार्यासाठीं दिल्या आहेत. पण आपल्या हातून त्या विश्वासाचा दुरुपयोग घडला आहे. त्यामुळें अविश्वास उत्पन्न होऊन ते शकेखोर बनले. यांत त्याचेकडे काय दोष आहे ? तो अविश्वास आपण आपल्या तपश्चर्येच्या प्रभावानें दूर केला पाहिजे. आपण निःस्वार्थबुद्धीनें एकदम कार्याला लागलों, जेवढी अनुकूलता असेल तेवढ्यावरच कार्य आरभून तें यशस्वी करून दाखविलें, तर हळू हळू त्याचा विश्वास आपणांस पुनः सपादता येईल. या कामासाठीं विशेषतः सुशिक्षित तरुणानीं कबर बांधली पाहिजे.

# अध्याय सातवा.

## विद्यार्थी आणि देशसेवा.

तरुण—शिक्षणाचा प्रसार करण्याचें काम विशेषतः सुशिक्षित तरुणांनीं हातीं घ्यावें असें आपण नुकतेंच सांगितलें. या तरुणांत आपण कॉलेजांतले व हायस्कुलातले विद्यार्थी यांची गणना कराल कीं नाहीं? म्हणजे त्यांनीं फावल्या वेळांत हें किंवा असलीं देशसेवेचीं दुसरीं कार्यें करावीं कीं नाहीं असा माझा प्रश्न आहे. याला आपण काय उत्तर देता?

महात्मा—जन्मभूमीचें ऋण फेडण्यासाठीं तिची सेवा करण्याची जबाबदारी जशी इतर प्रत्येक व्यक्तीवर आहे त्याप्रमाणें ती तरुण विद्यार्थिवर्गावरहि खास आहे तेव्हां त्यांनीं देशसेवेचीं कार्यें करावीं कीं नाहीं असा प्रश्नच माझ्या मतें उपस्थित होत नाहीं. त्यांनीं ती कोणत्या प्रकारें करावी असें विचारण्याचा तुमचा कदाचित् हेतु असेल.

तरुण—होय. हाच माझा हेतु आहे.

महात्मा—विद्यार्थ्यांनीं देशसेवा कशी करावी हा प्रश्न तुमच्याप्रमाणें पुष्कळजण विचारतात. त्याचा सरळ जबाब असा आहे कीं त्यांनीं उत्तम विद्या संपादन करावी; शिकत असतांना आरोग्याची जतन करावी; आणि संपादन केलेलें

विद्याभ्यासाची वेळ आली म्हणजे देशसेवेच्या कामीं खर्च करण्याची तयारी ठेवावी. मला वाटतें यात त्यांनीं उत्तम देशसेवा केल्यासारखें होईल.

तरुण—विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडावें कीं नाहीं?

**महात्मा**—वस्तुतः हा प्रश्न जसा सरळ आहे तसें त्याचें उत्तरहि सरळ आहे, व तें हरएक विचारी माणसाला सहज देता येण्यासारखें आहे. पण आपल्या देशाच्या विचित्र परिस्थितीमुळें या प्रश्नाला नाजूक स्वरूप आलें आहे. राजकीय क्षेत्रात दोन भाग आहेत. एकात केवळ शास्त्र येतें; दुसऱ्यात त्या शास्त्राचा व्यावहारिक उपयोग करून दाखविणें हा भाग येतो. व्यवहारांतल्या अडचणी व्यवहारात प्रत्यक्ष पडल्यावर कळूं लागतात. म्हणून तरुणांनीं विद्यार्थिदशेंत असेपर्यंत शास्त्रप्रदेशात शिरावें, पण दुसऱ्या प्रदेशात प्रवेश करण्यात हानि आहे. राजकारणाचें शास्त्रज्ञान त्यांनीं पुस्तकातून मिळवावें; रिपोर्ट बारकाईनें वाचावे व त्यावर मनन करावें. विद्यार्थ्यांनीं येथपर्यंतच मजल मारावी, पुढें जाऊं नये, असें म्हणणारे कित्येक आहेत. मी त्यातला नाहीं. मी म्हणतों कीं राष्ट्रीय सभेसारख्या प्रतिष्ठित व जबाबदार लोकनायकांनीं भरविलेल्या राजकारणी सभेला जाण्याची व देशाच्या सद्यःस्थितीसंबधानें सन्मान्य लोकनायकांच्या तोंडून प्रत्यक्ष माहिती ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे. हाहि शिक्षणाचाच एक महत्त्वाचा भाग आहे. राजकारणाचा वस्तु-

पाठ अशा सभांना जाण्यानेंच मिळणार आहे. तो मिळ-ण्याच्या मार्गांत जर काहीं प्रतिबंध होत असेल तर तो अवश्यमेव दूर झाला पाहिजे. असल्या सभांतून भाषणें कर-ण्याची किंवा मत देण्याची परवानगी मात्र त्यांना देतां कामा नये. विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या अभ्यासांत व्यत्यय न येऊं देतां स्वयंसेवकाचें काम केलें तर हरकत नाहीं. त्याच्या योगानें त्यांना पुष्कळ लाभ होण्यासारखा आहे. देशांतले सन्मान्य पुढारी व लोकहिताला सर्वस्व अर्पण करणारे भारतमातेचे सत्पुत्र यांचीं चरित्रें प्रत्यक्ष अवलोकन करण्याची व त्यापा-सून बोध घेण्याची, त्यांच्याविषयीं आदर व्यक्त करण्याची व सेवा करण्याची संधी प्राप्त व्हावी अशी इच्छा कोणा हिंदी विद्यार्थ्याच्या ठायीं नसेल? ती नसली तर असले प्रसंग पाहिल्यावर ती उत्पन्न होईल. हाहि माझ्या मतें एक लाभच आहे.

**तरुण**—मग विद्यार्थ्यांना राजकारणी सभांना जाण्याच्या विरुद्ध कित्येक चांगले शहाणे म्हणविणारे लोक कां बोलतात?

**महात्मा**—त्याचें कारण मी असें समजतों कीं कित्येक राजकारणी सभांना जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कर्त-व्याविषयींच्या नियमांचें उल्लंघन होतें. शिक्षण घेण्याच्या ऐवजीं ते तें लोकांना देऊं पाहतात, पक्षापक्षांच्या भानगडींत पडतात; तटस्थपणा राखीत नाहींत, पुढाऱ्यांच्या गुणदोषांची तुलना करण्याचें सामर्थ्य नसतां ती करतात; आणि मोठ्या

शरमेची गोष्ट ही कीं कोणत्याहि पक्षाच्या सन्मान्य पुढाऱ्याच्या सबधान त्याच्या मनात पूज्यबुद्धि असावयास पाहिजे; पण तसें न होता उलट अत्यंत अनादर किंबहुना तिरस्कार यांचे बीज ते अशा सभांतून आणतात. म्हणून त्या विरुद्ध बोलावें लागतें. पण योग्य प्रकारें मर्यादा पालन केल्यास विद्यार्थ्यांनीं राजकारणी सभांस जाण्यास कांहीं हरकत नाहीं असें ते लोकसुद्धां म्हणतील.

# अध्याय आठवा.

## प्रस्तुतचा युगधर्म.

तरुण—हल्लींच्या सुशिक्षित तरुणांत आपणास कोणता ठळक दोष दिसतो ?

महात्मा—कोणालाहि त्याचे दोष दाखविलेले सहसा रुचत नाहीं. तथापि तुम्हीं विचारलेंच तेव्हां स्पष्टपणें बोलल्यावाचून माझ्यानें राहवत नाहीं. त्यांच्यांत मला पहिला मोठा दोष हा दिसतो कीं विद्या शिकावयाची ती युनिव्हर्सिटीच्या परीक्षा पास होऊन नावापुढें पदव्या मिळविण्यास सापडावें व मोठी सरकारी नोकरी मिळावी यासाठीं, अशी समजूत अजून पुष्कळांची आहे. परीक्षा पास होण्यावर ते आपल्या आयुष्याची मुख्य मदार ठेवतात. पण ही गोष्ट ते ध्यानांत घेत नाहींत कीं राष्ट्राची इमारत काहीं सरकारी नोकरीवर उभारावयाची नसते. सरकारी नोकरींत पैसा पुष्कळ मिळतो असेंहि नाहीं. सरकारी नोकरीपेक्षा खाजगी उद्योग—धंद्यांतच धनप्राप्ति अधिक होते असा पुष्कळांचा अनुभव आहे. मग या लोकांना त्या नोकरीचा येवढा मोह कां पडतो तें मला कळत नाहीं.

तरुण—पण सरकारी नोकरींत मोठी हुद्याची जागा मिळाली म्हणजे आराम मिळतो. खाजगी उद्योगधंदा करणारांना फार श्रम करावे लागतात.

महात्मा–मी विचारतों कीं ज्यांना काम करावयाचा कंटाळा आहे त्यांना फुकट दुसऱ्याच्या श्रमाचें खाण्याचा तरी कसा हक्क पोंचतो ? काम हेंच मनुष्याचें जीवन आहे. कामाचा कंटाळा करणें म्हणजे जीवनाचा कंटाळा करण्यासारखें आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, पोटासाठीं कष्ट करून पैसा मिळविणें हें काम अशिक्षित लोकहि आनंदानें करतात. सुशिक्षित म्हणविणारांना तें सुद्धा करण्याचा कंटाळा वाटणें ही केवढी शरमेची गोष्ट आहे! खरें म्हटलें तर त्यांनीं आपल्या विद्येला देशसेवेचें व परोपकाराचें साधन समजलें पाहिजे, आणि स्वतः शारीरिक मेहनत करून आपली उपजीविका करण्याचें उदाहरण घालून दिलें पाहिजे. पोटासाठीं श्रम करण्यास पुष्कळ सुशिक्षितांना लाज वाटते. शारीरिक श्रमांत हलकेपणा आहे अशी त्यांची समजूत झालेली आहे. पण हा त्यांचा केवढा भ्रम आहे ! स्वतःच्या श्रमावर स्वतःची उपजीविका चालविणें यांत कसली लाज किंवा हलकेपणा आला आहे ? हलकेपणा व लाज ही खरोखर ऐदीपणांत, आयतेखाऊपणांत व अप्रामाणिकपणाचे उद्योग करण्यांत वाटली पाहिजे. मजूरलोक या संबधांत सुशिक्षितांचे आदर्श म्हटले पाहिजेत. त्यांचा कित्ता सुशिक्षितांनीं वळविला पाहिजे, आणि शारीरिक श्रमावर निर्वाह चालवून आपल्या बुद्धीचा व विद्येचा फायदा जनसेवेच्या रूपानें देशाला दिला पाहिजे. कारण, निरपेक्ष देशसेवा हा प्रस्तुत काळाचा युगधर्म आहे. तो धर्म ते पाळतील तर त्यांच्यावरचें देशाचें ऋण अशतः तरी

त्यांच्या हातून फिटेल. जोंपर्यंत हें ऋण त्यांच्या हातून फिटणार नाहीं, तोंपर्यंत त्याचें धर्माचरण पूर्ण होणार नाहीं अशी माझी समजूत आहे. आज प्रत्येक उन्नतीच्या प्रयत्नांत आपणांस यावें तसें यश येत नाहीं याचें कारण देशसेवेला ज्यांनीं आपलें आयुष्य, बुद्धि, उत्साह व शक्ति अर्पण केली आहे अशा निरपेक्ष सेवकाची वाण हें आहे. सध्या आपले पुढें कामांचे डोंगर उभे आहेत, पण काम करणारेच नाहींत. लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्यास माणसें पाहिजेत; देशस्थितीविषयींची माहिती गोळा करून लोकांना ती सुलभ करून देणारीं माणसें पाहिजेत; लोकांत जागृति उत्पन्न करण्यासाठीं वक्ते, हरिदास, पुराणिक यांची जरूरी आहे; दुष्काळासारख्या आपत्तीचे प्रसंगीं लोकांच्या अडचणी व दुःखें निर्भीडपणें सरकारापुढें मांडणारे व लोकांना साह्य करणारे स्त्रीपुरुष पाहिजेत. प्रत्येक कामांत निरपेक्ष व झटून कळकळीनें कामें करणारावांचून नडत आहे. ही अडचण दूर करण्यासाठीं तरुणांनीं पुढें यावयास पाहिजे. असे लोक पुढें आल्यावांचून आपला देश वर डोकें काढणार नाहीं. हें घडेपर्यंत आपला देश उन्नतीच्या मार्गाला लागला आहे असें सुद्धा म्हणण्यास मी तयार नाहीं. आपलें घर, आपला संसार, आपली बायको व मुलें येवढींच काय तीं आपलीं, बाकीचे आपले कोणी नाहींत, व त्याचें आपण कांहीं लागत नाहीं, अशी संकुचित बुद्धि जोंपर्यंत आमच्या तरुणांच्या ठायीं राहील तोंपर्यंत देशाच्या उन्नतीची आशा करणें व्यर्थ

आहे अशी माझी समजूत आहे. पण या बाबतींत अगदीं निराश होण्याचें कारण मला दिसत नाहीं. सुदैवानें अशी मंडळी जागजागीं तयार होत आहे या गोष्टीचें प्रत्यक्ष प्रमाण पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी, गोखल्यांची सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, आर्यसमाजाच्या गुरुकुल संस्था वगैरे संस्था होत. अशा संस्थांची संख्या फार अल्प आहे. पण ती वाढण्याचीं चिन्हें दिसत आहेत ही मोठी समाधानाची गोष्ट मी समजतों, आणि त्यामुळें हिंदुस्थानाच्या भाग्यसूर्याचा उदय लवकरच होणार आहे अशी आशा मला वाटत आहे.



# अध्याय नववा.

## धर्म आणि धर्मशिक्षण.

**तरुण**—शिक्षणासंबधानें आपलें नुकतेंच बोलणें झालें, त्यांत धार्मिक शिक्षणाचा उल्लेख कोठें आला नाहीं. त्यावरून आपणाला धर्माचें विशेष महत्त्व वाटत नसावें अशी माझी समजूत झाली आहे. ही समजूत खरी आहे काय?

**महात्मा**—धार्मिक शिक्षणाबद्दलचा उल्लेख नजरचुकीनें राहून गेला असला पाहिजे. धर्माचें महत्त्व मला विशेषसें वाटत नाहीं ही तुमची समजूत अगदीं चुकीची आहे. माझें तर स्पष्ट असें मत आहे कीं आपल्या प्रत्येक चळवळीला—माणसाच्या प्रत्येक कृत्याला—धर्माचें अधिष्ठान अवश्य पाहिजे. धर्माच्या तात्त्विक बाजूकडेसच पाहणाऱ्याची संख्या आपल्या देशांत मोठी आहे. पण तात्त्विक बाजूपेक्षाहि देशहिताच्या दृष्टीनें तिची व्यावहारिक बाजूच अधिक महत्त्वाची आहे. म्हणून तिच्यासंबधानें चार शब्द तुम्हाला सांगावेसे वाटतात. मोक्षप्राप्ति हें धार्मिक आचरणाचें ध्येय आहे. अंगाला राख फासून व संसाराचा त्याग करूनच तें ध्येय प्राप्त करून घेतां येतें अशी कित्येकांची समजूत आहे. पण माझी समजूत तशी नाहीं. प्रपंचातलीं आपलीं कर्तव्यें नीटपणें बजावून व जीवनाचा पूर्ण अनुभव घेऊनच मोक्ष मिळविणें शक्य व इष्ट

आहे असें मला वाटतें. मात्र संसाराचा पूर्ण अनुभव घेणें याचा अर्थ कित्येक आधुनिक लोक करतात त्याप्रमाणें येथील भोग भोगणें असा मी करीत नाहीं. सर्व बाबतींत जागरूकपणानें इंद्रियनिग्रह करून व संयम पाळून भूतमात्राविषयींचें आपलें कर्तव्य पार पाडणें हा मोक्षप्राप्तीचा खरा मार्ग आहे असें मी समजतों. आपला देश एके काळीं धर्मोन्नतीसाठीं साऱ्या जगांत प्रसिद्ध होता. सत्य, अहिंसा, अस्तेय, आणि अपरिग्रह हीं धर्मतत्त्वें प्रत्येक व्यक्तीच्या आचरणांत होतीं. या तत्त्वांच्या पायावर समाजाचा सगळा व्यवहार चालला पाहिजे. तो चालत नाहीं यामुळें आपण दुःखपरंपरा भोगीत आहों. आपला समाज धर्मच्युत झाला आहे हेंच त्याच्या अवनतीचें कारण आहे. जेथें धर्म नाहीं तेथें विद्या नाहीं, लक्ष्मी नाहीं, आरोग्य नाहीं; धर्मरहित स्थितींत सर्वत्र शुष्कता व शून्यताच रहावयाची. म्हणून धर्म हा जसा प्रत्येक व्यक्तीनें आपल्या प्रपंचांतल्या आचरणांत पाळणें अवश्य आहे, तसा समाजानें राष्ट्रीय प्रपंचांतहि पाळणें अवश्य आहे. त्याशिवाय त्या समाजाचें शाश्वत कल्याण कधीं होणार नाहीं. सर्व पुरुषार्थांच्या आणि राष्ट्रकार्यांच्या मुळाशीं असलेल्या धर्माला सध्याच्या शिक्षणपद्धतींत योग्य स्थान मिळू नये यासारखी हानिकारक गोष्ट माझ्या मतें दुसरी कोणतीहि नाहीं. धर्माविषयीं सध्याच्या तरुण मंडळींत जें औदासीन्य दिसत आहे, त्यामुळेंच त्यांच्या आचरणांत स्थैर्य आढळत नाहीं. धर्माचें ज्ञान असल्याशिवाय माणसाला निर्दोष व

शुद्ध आनंद अनुभवतां येत नाहीं. तो आनंद अनुभवण्यासाठीं प्रत्येक माणसानें काहीं शास्त्रपठन व त्यावर विचार नित्य नेमानें थोडा वेळ तरी केला पाहिजे. त्याच्या योगानें बावरलेल्या मनाला स्थिरता व शांति येऊन आनंदाची प्राप्ति होते. नुसता विचारहि उपयोगीं नाहीं. त्या विचाराप्रमाणें आचारहि ठेविला पाहिजे. सकाळीं उठून निंद्या कुकल्यानें किंवा गप्पा झोडल्यानें स्वतःचें किंवा दुसऱ्याचें कल्याण होऊं शकत नाहीं. नझीर कवीनें म्हटलें आहे कीं ' चिमणी सुद्धां चिंव चिंव करून सकाळ संध्याकाळ खुदाचें नांव घेत असते. पण आपण मात्र पाय लांब करून निजून राहतों. ' वाटेल त्या उपायानें पण प्रत्येक विद्यार्थ्यानें धर्मशिक्षण मिळविलेंच पाहिजे. शाळेंत धर्मशिक्षण देवोत न देवोत, स्वतःच्या प्रयत्नानें ज्यानें त्यानें आपल्या शिक्षणांतली ही उणीव पुरी करून घेतली पाहिजे. फार राहिलें, पण तुळसीदासजींचें रामायण व श्रीमद्भगवद्गीता यांचें तरी नित्य नेमानें पठन ठेवावें, त्यावर थोडा वेळ तरी शांत चित्तानें मनन करावें, आणि त्यांतला उपदेश आपल्या आचरणांत आणण्याचा यत्न करावा. तुमच्यापाशीं मानसरूपी कोहिनूर हिरा आहे. त्यावर मळ साचूं देऊं नका. वरील ग्रंथांच्या वाचनानें व मननानें त्यावरचा मळ रोजच्या रोज झाडीत चला. प्रत्येक धर्मांत अशा तऱ्हेचें उत्तम धर्मपर व नीतिपर शिक्षण देणारे ग्रंथ आहेत. सर्वांविषयीं आदरबुद्धि ठेवा. हिंदूंनीं व मुसलमानांनीं परस्परांचे धर्मग्रंथ आदरपूर्वक व भक्तिभावानें

वाचिले पाहिजेत. त्याच्या योगाने परस्पराच्या धर्मातल्या गुणांची किंमत ओळखता येऊ लागून परस्परामधील बंधु भाव दृढ होण्यास त्याची उत्कृष्ट मदत होईल. मी पुनः पुनः सांगतों कीं धर्म ही केवळ शोभेची अथवा लोकांना दाखविण्यासाठीं काचेच्या कपाटांत नीट व्यवस्थेनें मांडून ठेवण्यासारखी वस्तु नाहीं. जे आपले धार्मिक विचार अशा रीतीनें केवळ बोलण्यात दाखवीत असतील, व आचरणात ते प्रकट होत नसतील, ते माझ्या मतें केवळ दांभिक होत. त्यांचें आचरण खरें धर्माचरण नव्हे. धर्मविचार नित्याच्या आचरणात उतरले पाहिजेत. आपला सगळा व्यवहार धर्ममय झाला पाहिजे. राजकारणासारख्या महत्त्वाच्या बाबतींत तर ही गोष्ट विशेषतः ध्यानात ठेविली पाहिजे.

# अध्याय दहावा.

## पाश्चात्य सुधारणा.

**तरुण**—विद्यार्थ्यांत व तरुणात धर्माविषयींची आस्था वाढली पाहिजे असें आपण नुकतेंच सांगितलें. पण या धार्मिकतेच्या पायीं हिंदुस्थानानें आपलें सर्वस्वीं नाश करून घेतला आहे; या धर्माच्या पायीं आपापसांत मारामाऱ्या व दंगे होऊन क्वचित् प्रसंगीं रक्तपात सुद्धा झालेला आहे, या आमच्या धार्मिकतेमुळेंच उद्योगाविषयीं पराङ्मुखता, आणि आळशी होऊन बसण्याकडे लोकाची प्रवृत्ति झाली आहे व त्यामुळें औद्योगिक अवनतीच्या तळाशीं आम्ही जात चाललों आहों. तेव्हां तुमच्या आताच्या उपदेशाने मागच्या काळात घडलेली चूक दुरुस्त न होतां उलट ती अधिक दृढच होईल याची वाट काय?

**महात्मा**—तुमच्यासारख्या सुशिक्षिताच्या मनात धर्माचें खरें स्वरूप व दांभिकता, धर्मश्रद्धा आणि धर्मवेड इ० गोष्टींचा घोटाळा झालेला आहे हें पाहून मला फार दुःख वाटतें. अहो, तुम्ही जे दुष्परिणाम सांगितले ते धार्मिकता वाढल्यामुळें घडलेले नव्हेत; तर उलट धर्माविषयींच्या अज्ञानाचे ते परिणाम आहेत. धर्म काहीं तुम्हाला दुसऱ्याचें लुबाडण्याला किंवा त्याचीं डोकीं फोडण्याला सांगत नाहीं. दांभिक

भोंदू, दुसऱ्याच्या पैशावर स्वतःची चगळ चालविणारे ऐदी, आणि भोळ्याभाबड्यांना फसवून स्वत.ची तुबडी भरणारे लबाड लोक प्रत्येक धर्मांत आहेत. म्हणून धर्मामुळें असे प्रकार घडतात असें म्हणता येत नाहीं. धर्म कशाला म्हणतात, खऱ्या धर्माचें लक्षण काय, त्याचें ध्येय कोणतें इ० गोष्टींविषयीं लोकांत जितकें अज्ञान ज्यास्त माजून राहील तितक्या प्रमाणानें या गोष्टींना उत्तेजन मिळेल. म्हणून हें अज्ञान अगोदर दूर करून खरी धार्मिकता वाढविली पाहिजे असें मी म्हणतों.

**तरुण**—यापेक्षां सुधारणेच्या प्रसार जसजसा होईल तसतसे हे दुष्परिणाम कमी कमी होत जातील असें म्हणणें अधिक सयुक्तिक होणार नाहीं काय?

**महात्मा**—तुम्ही जिला ‘ सुधारणा ’ समजतां ती खरी सुधारणा नसून नुसतें इंद्रजाल आहे; आणि खरें पुसाल तर धर्मभोळेपणा एकवार पत्करेल, पण ही सर्वभक्षक घातकी सुधारणा नको असें मी तरी निदान म्हणेन. ही सुधारणा म्हणजे नुसती जिवंत आग आहे. हिच्या ज्वाळेंत अशी कांहीं जादू भरलेली आहे कीं आमचे लोक पतंगासारखे तिनें आपोआप आकर्षिले जाऊन तींत स्वेच्छेनें उड्या टाकीत आहेत!

**तरुण**—सुधारणेविषयीं आपलें हें मत इतर लोकांच्या मताहून फार निराळें दिसतें. तेव्हा तें विस्तारपूर्वक ऐकण्याची मला इच्छा आहे.

महात्मा—प्रथम पाश्चात्य लोक जिला सुधारणा समजतात व जिचें अनुकरण आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर सध्या चाललें आहे तिचीं लक्षणें काय आहेत ते पाहू. तिचें पहिलें लक्षण हें आहे कीं मनुष्यें विषयाच्या सुखोपभोगात जीवनाचें सार्थक व पुरुषार्थ मानितात. चांगल्या भपकेबाज व टोलेजग वाड्यातून राहणें, चागल्या उंची कपड्यांनीं सर्व अंग आच्छादणें, पायात जोडे घालणें, निरनिराळ्या प्रकारच्या बंदुका वगैरे शस्त्रास्त्रें वापरता येणें, स्वतः जमीनीची मशागत करण्याऐवजीं यंत्राकडून तिचीं कामें करवून घेणें, पुष्कळ पैसा जमविणें, वगैरे गोष्टी सुधारणेचीं चिन्हें समजलीं जातात. तसेंच छापखान्यातून भराभर पुस्तकें छापून काढणें, आगगाडीनें शेंकडों कोसांची मजल एका दिवसात करता येणें, बटन दाबल्याबरोबर आपणास हव्या त्या वस्तु जागचे जागीं स्वतःस हातपाय न हालवावे लागतां प्राप्त होणें हींहि सुधारणेचींच चिन्हें होत. पूर्वीं मोकळ्या हवेंत झेपेल तेवढें काम लोक स्वतंत्रपणें करीत; आता हजारों मजूर कारखान्यातून आणि खाणींतून एकत्र कामें करतात; त्यामुळें त्याची प्रकृति बिघडते, त्यांचे हाल कुत्रा खात नाहीं, आणि त्याच्या श्रमावर कारखानदार मात्र गबर होतात. पूर्वीं माणसांना मारहाण करून गुलाम बनवीत; आतां पैशाची व उपभोगाची लालूच दाखवून त्यांना गुलाम बनविण्यांत येतें. इकडे डाक्तराची व दवाखान्याची संख्या वाढत आहे, तर तिच्याबरोबर पूर्वीं ज्याचीं नावें सुद्धां कधीं कोणीं ऐकिलीं नव्हतीं अशा नव्या नव्या रोगांचीहि संख्या

झपाट्यानें वाढत आहे. हेंहि सुधारणेचेंच चिन्ह! पूर्वी लोकांचा आहार नियमित प्रमाणात व नियमित वेळीं होत असे; आता दोन दोन तासानीं कांहीं तरी खायला प्यायला मिळालें नाहीं तर कसेंसेंच होतें! अशीं या पाश्चात्य सुधारणेचीं अनेक लक्षणें सागता येतील. या सुधारणेंत धर्माला व नीतीला खरोखर वाव नाहीं. धर्माचें अवडबर व नीतिमत्तेच्या थापा हव्या तेवढ्या माराव्या! शारीरिक सुखाकडेसच सगळें लक्ष. त्याचाच शोध सारखा चालला आहे. पण खरें सुख अद्याप हातीं लागत नाहीं. ही सुधारणा म्हणजे मूर्तिमत अधर्म व अनीति होय. पण युरोपातल्या लोकाना या सुधारणेने अगदीं वेड लाविलें आहे. तिच्यामुळें लोकाच्या अगातली खरी ताकद नष्ट झाली, म्हणून ती टिकविण्यासाठीं ते लोक निशाबाजी करतात. गृहिणीचें खरें स्वराज्य म्हणजे गृह हें असावयास पाहिजे. पण नुसत्या इंग्लडातच चाळीस लक्ष अनाथ अबलाना पोटासाठीं गाढवाप्रमाणें घराबाहेर राबावें लागत आहे! या सुधारणाबाईचा प्रभाव किती वर्णावा! आपल्या हिंदुधर्मानें ज्याला कलिकाल किंवा महमद पैगबराने सैतानाचें राज्य म्हटलें आहे ती हीच सुधारणा होय. या सुधारणेची घाण सगळ्या युरोपियन राष्ट्रात पसरली आहे आणि शब्दानीं वर्णन करण्यास अशक्य अशी हानि करीत आहे. आपण तिच्यापासून दूर राहून स्वतःचा बचाव केला नाहीं, तर लवकरच मोठा कठीण प्रसग येऊन गुदरेल यात मला बिलकुल शका वाटत नाहीं.

# अध्याय अकरावा.

## पाश्चात्य सुधारणेचे दुष्परिणाम.

तरुण—पण पाश्चात्य सुधारणेंत असें काय आहे कीं त्यामुळें तिचे असे दुष्परिणाम व्हावेत?

महात्मा—त्या सुधारणेच्या मुळाशीं सुखोपभोगाची आकांक्षा ही गोष्ट आहे. सुखप्राप्तीला धनसंचय हवा अशी पाश्चात्य लोकांची समजूत झाली आहे आणि तो धनसंचय करण्यासाठीं यंत्रें आणि कारखाने तिकडे भराभर निघत आहेत. हीं यंत्रें नसतीं तर त्या आकांक्षेला कांहीं आळा बसला असता; पण यंत्रामुळें ती वाढत गेली. या यंत्राचा प्रसार हिंदुस्थानांत सुरू होतांच ती राक्षसी सुधारणा इकडे आलीच इकडेहि तिनें तोच अनर्थ माडिला आहे. यंत्रांनीं इकडे नीतिभ्रष्टता आणिली आहे. गिरण्यांतून काम करणारांची नीतिमत्ता कशी असते तें त्यानाच विचारावें. अशा अनीतीच्या प्रसाराला मदत करून त्यावर श्रीमंत होणाऱ्या कारखानदारांची नीतिमत्ताहि तशीच असावयाची! आमच्या देशांत यंत्रे येण्याच्या पूर्वीं हिंदुस्थानांत पुष्कळ चांगले कारागीर होते. पण आतां त्या कारागिरीचा जवळ जवळ लोप झाला आहे, आणि ते लोक उपाशी मरत आहेत. हें सगळें पाप कारखानदाराच्या माथीं बसेल, चुकणार नाहीं.

**तरुण**—एकूण म्याचेस्टरनें आमचा पैसा काढून नेऊन आम्हाला दरिद्री केलें; हिंदी कारागिराचा धंदा बसवून त्याना भिकेला लाविलें; आणि आपल्या लोकात नीतिभ्रष्टतेचा शिरकाव करून दिला, असें आपलें म्हणणें दिसतें.

**महात्मा**—होय, असें आहे खरें. पण मी त्याबद्दल म्याचेस्टरला दोष देण्याला तयार नाहीं. हा सगळा आमचाच दोष आहे. आम्हीं विलायती कापड वापरू लागलों म्हणून ते लोक तें विणून इकडे पाठवू लागले. आम्हीं लोकांनीं विलायतचीं यत्रें इकडे आणून इकडे गिरण्या घातल्या नसत्या तर हा अनर्थ आम्हांला इतका लवकर बाधला नसता.

**तरुण**—असलेल्या गिरण्या काढून टाकाव्या असें आपण म्हणता काय?

**महात्मा**—तसें करता आलें असतें तर मीं तसेंहि म्हटलें असतें. पण आता काय त्याचें? त्या आता स्थायी झाल्या आहेत. गिरणीवाल्यांना द्रव्यलोभानें पूर्णपणें अंध केलें आहे. गिरण्या काढून टाका म्हटल्यानें ते थोडेच तुमचें ऐकणार आहेत! आता निदान गिरण्यांच्या सबधानें साहस वाढवू तरी नका येवढीच विनंति फार तर त्याना आपण करू शकू. त्यांनीं देशहिताकडे दृष्टि देऊन स्वतःचा द्रव्यलोभ कमी केला आणि आपली विनंति ऐकली तर त्याची भलाई म्हणावयाची!

**तरुण**—पण गिरण्यातल्या यन्त्रांसारख्या दुसऱ्या आणखी पुष्कळ गोष्टी आपल्या देशात आल्या आहेत. त्यांनींहि हिंदु-

स्थानचें असेंच नुकसान केलें आहे असें तुम्हास वाटतें काय? उदाहरणार्थ, आगगाड्या घ्या. आगगाड्यामुळें दूरचा प्रवास देखील किती लवकर व सुखानें करतां येतो! त्याना तरी तुम्ही चागलें म्हणाल कीं नाहीं?

महात्मा—आगगाड्या तर आमच्या देशाच्या एकदर नाशाच्या मुळाशीं आहेत. आगगाड्या नसत्या तर यत्रांचा फैलाव आमच्या देशात झाला नसता. आगगाड्या नसत्या तर प्रवास करणारीं माणसें थोडकीं निघून ससर्गानें प्लेगचा प्रसार देशभर झाला नसता. आगगाड्यामुळेंच दुष्काळ वारवार पडू लागले आहेत. कारण, त्यामुळें इकडचें धान्य तिकडे नेण्याची सोय झाली आहे. आगगाड्यामुळें माणसामध्ये दुष्टपणा व हलकटपणा वाढला आहे.

तरुण—पण आगगाड्यामुळें निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकामध्यें परिचय वाढून एकराष्ट्रीयत्व घडून येण्यास मोठी मदत झाली आहे हें आपल्या लक्षात कसें येत नाहीं?

महात्मा—हिंदुस्थानात आगगाड्या होण्यापूर्वी एकराष्ट्रीयत्वाची भावना नव्हती ही तुमची समजूत मुळातच चुकलेली आहे. पजाब, बगाल, महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, वगैरे सगळ्या प्रांतातून लोकाची राहणी व विचार पूर्वीच्या काळीं सारखे होते. आगगाड्या नव्हत्या त्यावेळीं आपले पुढारी पायानीं किंवा बैलगाडीनें तीर्थयात्राच्या निमित्तानें काशीपासून रामेश्वरापर्यंत व जगन्नाथापासून द्वारकेपर्यंत फिरत

असत, परस्परांच्या भाषा परस्पर शिकत असत व परस्पराची माहिती त्यांच्यात राहून करून घेत. हे इतके सायास ते कशासाठीं करीत असें तुम्हांला वाटतें? ईश्वरभजन त्यांना घरीं बसून करता आलें नसतें काय? परमेश्वर ' जलस्थल व्यापुनि दशांगुळें उरला ' आहे हें जर त्याना ठाऊक होतें, तर त्यांना इतक्या कष्टमय यात्रा करून काय मिळवावयाचें होते? या यात्रांची कल्पना आपल्या पूर्वजांनीं फार दूरदृष्टीनें —एकराष्ट्रीयत्व उत्पन्न करण्यासाठींच—काढली, व हिंदुस्थानच्या चारी दिशाना चार धाम स्थापन केले. या यात्राच्या निमित्तानें त्यांनीं लोकाना परप्रांतातल्या लोकाशीं मिसळावयास लावून त्यांचा एक जीव केला. आगगाड्यानीं एकराष्ट्रीयत्व उत्पन्न केलें नाहीं; तें अगोदरचेंच आमच्यात होतें. आगगाड्यानीं जर काहीं केलें असेल तर नुकसानच केलें आहे.

**तरुण**—आगगाड्यानीं आपल्या देशाचें नुकसान केले आहे असें जर आपणास मनापासून प्रामाणिकपणानें वाटत आहे, तर आपण आगगाडीनें कां प्रवास करतां?

**महात्मा**—तुमचा प्रश्न अगदीं बरोबर आहे. ती माझी चूक आहे हें मी कबूल करतों. पण मी तरी तुमच्यांतलाच एक पाश्चात्य सुधारणेच्या या वेडगळ धावपळींत राहणारा मनुष्य आहें. माझी शक्ति मर्यादित आहे, मनाचा दुबळेपणाहि सर्वस्वी गेलेला नाहीं. यामुळे हा कलंक नाइलाजास्तव मला पतकरावा लागत आहे. मी जेव्हां जेव्हां आग-

गाडींत बसतों, तेव्हा तेव्हा माझें मन मला खातें आणि तू सत्य मार्गापासून चळत आहेस असें सांगितल्यावांचून तें राहत नाहीं. नाइलाजास्तव अशा पुष्कळ गोष्टी तुम्हा-आम्हाला कराव्या लागतात व लागतील. पण त्या चांगल्या नाहींत येवढें तरी मनानें निश्चित केलेलें असणें बरें.

तरुण—नुसत्या कापडाच्या गिरण्या व आगगाड्या यांच्या विषयींच आपला असा प्रतिकूल ग्रह झालेला आहे कीं सामान्यत्वे करून सर्वच यंत्रे नाशकारक आहेत असें आपलें म्हणणें आहे?

महात्मा—सगळ्याच यंत्रासंबधानें माझें असें मत आहे. यंत्राच्या ठायीं उपयुक्त असा एकहि गुण मला आढळत नाहीं; अवगुणासंबधानें मात्र एखादा ग्रंथ लिहिता येईल इतकी त्याची संख्या मोठी आहे.

तरुण—हें मत जरा चमत्कारिकच नव्हे काय? छापण्या-च्या यंत्रानें ज्ञानाचा प्रसार किती झपाट्यानें करता येतो तें आपण पाहतोंच. फार कशाला? आपल्या निरनिराळ्या विषयावरील मताचा प्रसार सर्वत्र होऊन लोकांचे डोळे उघ-डावे अशी आपली इच्छा स्वाभाविकच असणार. आपल्या या मताचें संकलन करून ' गांधी-गीता ' या नावानें एखा-द्यानें पुस्तक छापिलें तर आपल्या दृष्टीनें चांगल्या अशा ज्ञानाचा प्रसार सत्वर देशभर होईल कीं नाहीं?

महात्मा—छापण्याच्या यंत्रानें चांगल्या ज्ञानाच्या प्रसा-राला थोडीशी मदत केली असली तर असंख्य घाणेरड्या

पुस्तकांच्या प्रकाशनानें समाजात अनीतीचा व कुविचारांचा प्रसार किती तरी पटीनें ज्यास्त केलेला आहे! आणि छाप-लेलीं पुस्तकें वाचणारे तरी कोण असतात? यंत्राच्या जा-ळ्यांत अगोदरच गुरफटले गेलेलेच सगळे वाचक असणार.

**तरुण**—पाश्चात्य सुधारणा, यंत्रें, आगगाड्या वगैरेसंब-धाचें आपलें हें मत खरोखर विचार करण्यासारखें आहे असें मलाहि आतां वाटू लागलें आहे. आतांपर्यंत जो उठला तो या गोष्टींची तारीफच करीत गेला. यामुळें या विषयासंबधानें एकतर्फी विचार लहानपणापासून आमच्या डोक्यांत भरले आहेत. आपण आता दुसरी बाजू मांडली, त्यावरून या बाबतींत आमच्या सुशिक्षितांनीं यापुढें तरी केवळ गतानु-गतिकत्व न पतकरतां स्वतंत्रपणानें विचार करण्यास शिकलें पाहिजे अशी माझ्या मनाची खात्री झाली आहे. आपण मला ही नवी दृष्टि दिली याबद्दल मी आपले किती उपकार मानावे तें मला कळत नाहीं.

# अध्याय बारावा.

## भारतीय सुधारणा.

तरुण—जिनें सध्याच्या काळीं अर्धें अधिक जग पादाक्रांत केलें आहे त्या पाश्चात्य सुधारणेला आपण अगदीं टाकाऊ व हानिकारक ठरविली. मग आता सुधारणा ती कशाला म्हणावयाचें ?

महात्मा—जिच्या योगानें मनुष्याला आपलीं कर्तव्यें बजावण्याचा मार्ग सुलभ होतो तिचें नांव सुधारणा. कर्तव्यपालन म्हणजे नीतियुक्त आचरण, अर्थात् मनाचें व इंद्रियांचें संयमन. आत्मज्ञानाचें हेंच साधन आहे. तें जसें आपल्या धर्मग्रंथात सांगितलें आहे तसें कोठेंहि नाहीं. सुखप्राप्तीचा खरा मार्ग हाच आहे. आत्मसंयमनानें जसें अखेर सुख प्राप्त होतें, तसें भोग भोगल्यानें होत नाहीं. जितके अधिक भोग भोगावे तितकी त्यांच्याविषयींची इच्छा वाढतच जाते; तृप्ति होतच नाहीं. यावरून आपल्या पूर्वजांनीं ठरविलें कीं सुखदुःख या निवळ मनाच्या कल्पना आहेत; आणि व्यवहारातहि तेंच अनुभवास येतें. पैशाची हाव धरणारे श्रीमान् लोकसुद्धा दुःखी आणि थोडक्यांत समाधान मानून राहणारे गरीब सुद्धा सुखी असलेले आढळतात. भोगाची वासना जितक्या मानानें सोडावी तितकें सुख अधिक लागतें, हें

पाहून आपल्या पूर्वजानीं भोगाच्या वासना जेणेंकरून सुट-तील असे नियम घालून दिले. आमच्या भारतीय सुधारणेचें श्रेष्ठत्व यातच आहे. ग्रीस, रोम सारखीं राष्ट्रें नामशेष झालीं, पण हिंदुस्थान अजून टिकून राहिलें आहे. याचें कारण त्याचा पाया—भारतीय संस्कृति—मजबूत आहे.

तरुण—पण जुन्याला नेहमीं चिकटून राहण्यात काय अर्थ आहे? जुन्या राहणींत जर फेरफार केले नाहींत, तर साच-लेल्या डबक्यातल्या पाण्याप्रमाणें घाण माजेल, आणि कुजून कुजून आपलें राष्ट्र लयाला जाईल, याची वाट काय?

महात्मा—चंचलतेलाच सुधारणा म्हणणारे कोणी अस-तील तर भले असोत. पण चंचलता ही प्राणघातक असते हें पतंगाच्या उदाहरणावरून आपणास दिसतेंच आहे. आम-च्या पूर्वींच्या चालीरीतींपासून जर आम्हास सुखासमाधानानें राहता येत आहे, तर नाशकारक चढाओढींत पडण्याचें आम्हास कारण काय? ज्या आमच्या पूर्वजानीं तत्त्वज्ञाना-सारख्या गहन विषयात लाविलेले शोध पाहून हल्लींचे पाश्चात्य पंडित सुद्धा थक्क होत आहेत, त्याना काय यंत्राचा शोध लावणें कठीण होतें? पण त्यांनीं पाहिलें कीं यंत्राच्या फंदात पडून सुखाची लालसा वाढविणें म्हणजे लोकांना गुलाम बनाविणें आणि नीतीचा त्याग करण्यास लावणें आहे. म्हणून त्यांनीं आपल्या बुद्धीचा उपयोग ऐहिक सुखाचीं साधनें शोधण्यात न लावता श्रेष्ठ प्रतीचें जें पारमार्थिक सुख त्याचे मार्ग शोधण्यात केला. यात त्याची केवढी दूरदृष्टि

दिसून येते! आपल्या पूर्वजांनीं साधी राहणी मुद्दामच घालून दिली. शहरें स्थापणें म्हणजे आरोग्याचा नाश, नीतिभ्रष्टतेला साह्य, आणि लुच्चे लोकांना गरीब लोकांना लुटण्याची संधी देणें आहे हें ओळखून ते शहरें स्थापण्याच्या भानगडींत पडले नाहींत. आपली समाजव्यवस्था सगळी दूरदृष्टीच्या व नीतिमत्तेला पोषक अशा तत्त्वावर बसविलेली आहे. आपल्या देशांत पूर्वी अदालती, वकील, वैद्य सर्व कांहीं होते. पण अदालतींत जाऊन तंट्याचा निकाल करून घ्यावयाचा नाहीं, होता होईल तों आपापसांत वाद मिटवावयाचा, फार तर पंचायतीमार्फत निकाल करून घ्यावयाचा, अशी रीत असे. मग कज्जेदलाल वकिलांना कोण विचारतो? तसेंच उघड्या हवेंत राहून अंगमेहनत करण्यांत कोणालाहि शरम वाटत नसे, मिताहाराचा नियम सर्वांनी पाळण्यांत येई; हल्लींच्यासारखीं जिभेला चटोर करणारीं खाद्यें व पेयें आणि तीं विकणारीं भपकेबाज दुकानें नव्हतीं. त्यामुळें आरोग्य उत्तम राही. मग डाक्तरांचें व वैद्यांचें घर पाहण्याचा प्रसंग येतो कशाला? समाज पूर्णपणे स्वावलंबी होता. खरें स्वराज्यसुख त्यांतच होतें. जेथें पाश्चात्य सुधारणेचें वारें अजून फारसें गेलेलें नाहीं अशा रेल्वेपासून दूरच्या लहान खेड्यापाड्यांतून ही स्थिति कमजास्त मानानें अजूनसुद्धा दिसते. राहण्याला उत्तम स्थळें म्हटलीं म्हणजे हींच. इतकी स्पृहणीय स्थिति असल्यावर ती कोणाला बदलावीशी वाटेल?

१६३२

**तरुण**--पण हें हिंदुस्थानच्या स्थितीचें काल्पनिक चित्र आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी कोठें दिसते? येथें हजारों बालविधवा आहेत; दोन दोन तीन तीन वर्षांच्या अर्भकांचीं भावलाभावलीच्या लग्नासारखीं लग्नें लागत आहेत; धर्माच्या नांवावर कुमारिका वेश्या बनत आहेत, देवाला बळी अर्पण करावयाचा म्हणून मुक्या प्राण्याचा वध चालला आहे; कोणता अनाचार सध्या घडत नाहीं? ही सगळी भारतीय सुधारणाच असेल तर तिला दुरूनच नमस्कार असो!

**महात्मा**--तुम्हीं जे दोष दाखविले ते खरोखर दोषच आहेत; त्यांना सुधारणा कोण म्हणेल? इतकी काळजी-काट्यानें समाजव्यवस्था केली तरी हे दोष राहिले आहेत, आणि ते दूर करण्यासाठीं प्रयत्न अवश्यमेव व्हावयास पाहिजेत व होतील, आपणांत जो नवा जोम आला आहे त्याचा उपयोग हे दोष दूर करण्याकडे आपण करूं शकूं.

# अध्याय तेरावा.

## जातिभेद.

तरुण—आपल्या हिंदुसमाजपद्धतीची आपण येवढी प्रशंसा केली, पण जातिभेद हा केवढा कलंक त्यावर लागलेला आहे! बालविवाह, जरठकुमारी विवाह वगैरे दोष त्यापुढें अगदीं क्षुद्र आहेत. येवढा मोठा कलंक राहू देणें आपणास इष्ट दिसतें काय?

महात्मा—ज्याला तुम्ही कलंक समजता तो कलंक नसून हिंदुसमाजाचें खरें भूषण आहे. जातिभेदाच्या पायावर तर हिंदुसमाजाची इमारत इतकीं वर्षे टिकून राहिली आहे. तिच्यातच स्वराज्याचें बीज आहे. निरनिराळ्या लहान लहान जाति या लहान लहान लष्करी तुकड्यासारख्या आहेत. या तुकड्यामार्फत समाज सुधारणेचें कार्य लवकर घडवून आणिता येतें. प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यानीं आपापल्या जातींत सुधारणा घडवून आणिली म्हणजे एकदर समाजात तिचा प्रसार लवकर होतो. सर वि. हंटर म्हणतात कीं हिंदुस्थानात ही संस्था असल्यामुळेंच पॉपर लॉ (दारिद्री लोकासाठीं कायदा) येथें करण्याचें कारण पडलें नाहीं.

तरुण—अमक्यानें तमक्याच्या हातचें खावयाचें नाहीं, किंवा परजातींत विवाह करावयाचा नाहीं, असे निर्बंध घात-

त्यानें समाजांत विषमता व असमाधान उत्पन्न होतें, त्याची वाट काय?

**महात्मा**—ज्यांना कोणतेच निर्बंध नकोत, स्वेच्छाचरण करावयास पाहिजे, त्याच्यांत असमाधान उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. कारण, ही संस्था भोगेच्छेला मर्यादा घालते. आपल्या जातीच्या बाहेर रोटीव्यवहार किंवा बेटीव्यवहार करू नका, अशी मर्यादा घातली नाहीं तर माणसाच्या भोगेच्छा अनावर वाढून अनाचार माजेल, यासाठीं हें जातिबंधन ठेविलें आहे. संयम हा केव्हांहि सुखपरिणामीच असतो. इंग्लंडसारख्या देशात जातिभेद व्यवस्था नाहीं, तरी दुसरे काहीं निर्बंध आहेत. मुख्य मुद्दा हा आहे कीं माणसाच्या वर्तनांत संयम पाहिजे आणि तो जातिभेदाच्या कडक निर्बंधानें बळेंसळें तरी पाळावा लागतो व त्यामुळें समाजाचें हित होतें. याशिवाय जातीजातीच्या पंचाइतीमार्फत आपसातलीं भांडणें लवकर तोडता येतात, आणि एकच एक धंदा विशिष्ट जातींत पिढ्यान्‌पिढ्या राहिल्यामुळें त्या धंद्यातलें नैपुण्य कायम राहतें, वगैरे दुसरेहि फायदे आहेत.

**तरुण**—पण जातिभेदामुळें निरनिराळ्या जातींत रोटीव्यवहार होणें बंद होतें व त्यामुळें सहभोजनासारख्या प्रेमसंबंध वाढविणाऱ्या गोष्टींना मोठाच प्रतिबंध होतो त्याची वाट काय?

**महात्मा**—तुमच्या भोळेपणाची मला फार कींव येते. सहभोजनानें प्रेमसंबंध दृढ होतात ही गोष्ट अनुभवसिद्ध

नाहीं. युरोपियन लोकात सहभोजनें होतात; मग त्यांच्यांत महायुद्ध कां उत्पन्न व्हावें? प्रेमसंबंधांतलें मुख्य तत्त्व म्हणजे दुसऱ्यासाठीं आपण स्वार्थत्याग करण्याची तत्परता ठेवणें. हें बाजूस ठेवून भलत्याच गोष्टीला महत्त्व देण्यांत येतें ही चूक आहे. भोजन हा केवळ शरीरव्यापार आहे. चटोर जिभेच्या लोकांनीं या व्यापाराचें निष्कारण अवडंबर माजविलें आहे. खरा प्रकार असा आहे कीं जातिभेद समाजात दुफळी उत्पन्न करीत नाहीं; तो संयम वाढवून समाजाला स्थिरताच आणितो. पण स्वैर वर्तन करूं पाहणारांच्या कल्पनेनें हें जातिद्वेषाचें भूत निर्माण केलें आहे, दुसरें कांहीं नाहीं.

# अध्याय चौदावा.

## अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न.

तरुण—आपण जातिभेदासारख्या संस्थेचें समर्थन केलें त्यावरून मला वाटतें कीं आपण महार, माग वगैरे वर्गांना समाजानें अस्पृश्य मानिलें आहे त्यांतहि एखादें तत्त्व शोधून त्या गोष्टीचें समर्थन क राल. तसें असेल तर तें तत्त्व ऐकण्याची मला उत्सुकता आहे. अस्पृश्यता निवारणाच्या एकंदर प्रश्नाविषयीं आपलें मत विचार करण्यासारखें असेल अशी माझी खात्री आहे.

महात्मा—माझ्या मतें अंत्यजाच्या अस्पृश्यतेचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याला धर्माचा आधार मुळींच नाहीं. हिंदुधर्मावर रूढीचीं जीं कित्येक पुटें बसलीं आहेत त्यांतलें हें एक पुट आहे. धर्माच्या नावाखालीं आज दोन हजार वर्षांच्या पापांची ही रास हिंदुधर्माच्या माथीं चढली आहे, व अजूनहि चढत आहे. या रूढीच्या पालनांतहि सारखेपणा नाहीं. आगगाडींत आपल्या शेजारीं भंगी येऊन बसलेला आपणास चालतो, इंग्रज व मुसलमान लोक अस्पृश्य मानलेल्याशीं सगळे व्यवहार करतात, व आपण त्या इंग्रजांशीं व मुसलमानांशीं तसेच व्यवहार करतों; अंत्यज बाटून खिस्ती झाल्यावर मग आपण त्याना अस्पर्श्य

समजत नाहीं; पण तेच चहाच्या दुकानांत आपण त्यांना मज्जाव करतों. ते मरत असले तरी आपण त्यांना शिवत नाहीं; त्यांच्या राहण्यासाठीं गांवाबाहेर निराळी जागा देण्यात येते. याहून अधिक तिरस्करणीय वर्तन तें काय असते ?

तरुण—पण हे लोक घाणींत काम करतात म्हणून आपला समाज स्वच्छतेसाठीं त्यांना दूर ठेवतो असें या वर्तनाबद्दलचें समर्थन करता येण्यासारखें नाहीं काय ?

महात्मा—घाणींत काम कोण नाहीं करीत ? घरोघर आया मुलांचे मलमूत्र काढीत असतात. हें घाण साफ करण्याचें काम नाहीं काय ? आया जशा पुनः स्वच्छ होतात, तसे भंगी, महार, वगैरे स्वच्छ होऊन तुमच्यात येऊन मिसळू लागले तर स्वच्छतेची सबब कोठें राहिली ? हे लोक घाणींत काम करून तुमच्या आरोग्यासाठीं स्वतःचा जीव धोक्यात घालतात हे त्यांचे उपकार तुम्ही त्यांना कायमचे दूर ठेवून आणि तिरस्कारानें वागवून फेडता हें तुमच्या माणुसकीस शोभतें काय ? आज सहा कोट देशबांधवांना तुम्ही असे अन्यायानें वागवीत आहां. याचें प्रायश्चित्त कोठें कराल ? आणि तें प्रायश्चित्त केल्याशिवाय तुमचा देश वर डोकें कसा काढील ? हिंदुधर्मशास्त्रांनीं अस्पृश्यतेचें समर्थन केलें आहे असें म्हणणाराचा हिंदुधर्माच्या न्यायीपणावर आणि पवित्रतेवर विश्वास नाहीं असें म्हटलें पाहिजे. हिंदुधर्मावरला हा कलंक धुतला गेलाच पाहिजे. त्या कामीं हा देह खर्ची पडला तरी बेहत्तर आहे. ज्या धर्मांत नरसी मेहत्यासारखे सर्व भूतांच्या ठायीं समदृष्टि ठेवणारे भगवद्भक्त होऊन गेले त्या धर्मांत अस्पृश्यतेला जागा असणें मुळींच संभवनीय नाहीं.

---

# अध्याय पंधरावा.

## देशी भाषा विरुद्ध इंग्रजी भाषा.

तरुण—जनतेंत शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय लोकांत कर्तव्यजागृति व्हावयाची नाहीं आणि आपली स्थिति सुधारणार नाहीं ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे हें माझ्या गळीं पूर्णपणें उतरलें आहे. पण हा शिक्षणाचा प्रसार इंग्रजी भाषेच्याद्वारें केला पाहिजे असें कित्येकांचें म्हणणें आहे. दुसरे कित्येक म्हणतात कीं उच्च शिक्षणसुद्धा मातृभाषेच्याच द्वारें देणें योग्य आहे. यासंबंधानें आपलें काय म्हणणें आहे?

महात्मा—दोन्ही पक्षाचे हेतु पवित्र आहेत. दोघेहि देशाचे हितचिंतक आहेत. पण फक्त पवित्र हेतु असले म्हणजे कार्यसिद्धि होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. शक्याशक्यता व मार्गाची व साधनाची योग्यायोग्यता याचाहि विचार करावा लागतो. प्रश्न फार मोठा व महत्त्वाचा आहे. देशीभाषाच्या द्वारें शिक्षण द्यावें कीं इंग्रजी भाषेच्या द्वारें हा प्रश्न नुसत्या गुजराथ प्रांतापुरता नाहीं, किंवा मुंबई इलाख्यापुरताहि नाहीं. तो सगळ्या हिंदुस्थानाचा प्रश्न आहे. तथापि या बाबतींत सगळ्या देशाचें एकमत होईल आणि मग आपण पाऊल टाकू असें म्हटलें तर किती काळपर्यंत थांबावें लागेल कोण जाणे! म्हणून प्रत्येक प्रांतानें आपा-

पल्यापुरता तरी या प्रश्नासंबंधानें मनाचा कांहीं निश्चय ठरवावा हें बरें.

**तरुण**—पण हा निश्चय ठरविण्यास कांहीं मूलभूत तत्त्वाचा पाया पाहिजे. कोणतें तत्त्व आपल्या मतें सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रयत्नाचा पाया होऊं शकेल?

**महात्मा**—मातृभाषेवरील प्रेम. या प्रेमानें बरीचशी कार्यसिद्धि होईल असें मला वाटतें.

**तरुण**—ती कशी?

**महात्मा**—लोकांच्या मनांत एखादी गोष्ट बिंबविण्याला सर्वांना समजेल अशी देशी भाषाच परक्या भाषेपेक्षा अधिक उपयोगीं पडते, व बोलणारालाहि आपल्या अंत:करणांतले विचार स्वयंस्फूर्तीनें व्यक्त करण्यास देशी भाषा हेंच स्वाभाविक व उत्कृष्ट साधन आहे. कारण, भाषा म्हणजे लोकांच्या स्वभावाचें व विचाराचें प्रतिबिंब पाडणारा आरसा आहे. लहानपणापासून जी भाषा आपल्या अंगवळणीं पडलेली असते तिच्या द्वारें हें प्रतिबिंब जसें अनायासें व स्पष्टपणें उठेल तसें मुद्दाम ओढून ताणून योजिलेल्या परक्या भाषेच्या द्वारें उठणें शक्य नाहीं. तसे करण्यात बोलणारालाहि त्रास पडतो, व श्रोत्यानाहि त्याचा अर्थ समजून घेण्यास प्रयास पडतात.

**तरुण**—पण लोकांच्या मनावर परिणाम करणारें भाषण करावयाचें असेल तर तें जोरदार, चमत्कृतिजनक, आणि

चटकदार अशा भाषेतच करावयास पाहिजे. हे गुण देशी भाषांच्या अंगीं कोठें आहेत?

महात्मा—हें सगळे वक्त्याच्या भावनेच्या दृढतेवर अवलंबून आहे. खरे कळकळीचे विचार अगदीं साध्या शब्दांच्या द्वारें सुद्धां इतके परिणामकारक होतात कीं ऐकणाराला आश्चर्य वाटतें. त्यांत मातृभाषेच्या अभिमानाची भर पडली म्हणजे दुधांत साखर पडल्यासारखें होतें. डॉ. रवींद्रनाथ टागोर, महात्मा मुनशीराम किंवा माननीय पंडित मदन मोहन मालवीय यांचं देशी भाषेतलं भाषण श्रोत्यांचे चित्त आकर्षून घेतातच कीं नाहींत? अगोदर विचार निर्मळ, अस्सल, कळकळीचे, स्वदेशी वातावरणातले असले पाहिजेत आणि नंतर मातृभाषेविषयींचे प्रेम पाहिजे; तिचे ठायीं श्रद्धा पाहिजे, म्हणजे सर्व काहीं उत्तम प्रकारें साधता येते. तुकाराम आणि रामदास यांनीं मराठीतूनच आपले विचार प्रकट केले ते इतके परिणामकारक रीतीनें कीं आज दीडशें वर्षांनंतरहि त्यांच्यातली शक्ति रतिमात्र कमी झालेली दिसत नाहीं. ते कोठें इंग्रजी शिकलेले होते? प्रेमानंद व शामळ, तुळसीदास आणि कबीर, यांनीं देशी भाषेतच रचना केली होती ना? सारांश, विचारात ओजस्विता असली आणि मातृभाषेविषयीं प्रेम असलें म्हणजे मातृभाषेंत केलेल्या भाषणातहि ती ओजस्विता प्रकट झाल्याशिवाय राहत नाहीं. पण भाषणांत किंवा लेखात इंग्रजीभाषा वापरावयाची कीं देशी भाषा वापरावयाची हा प्रश्न कोठें उपस्थित होणार?

जेथें ऐकणारांना इंग्रजी समजत असेल तेथें. पण आपल्या देशात सामान्य जनतेला बहुधा इंग्रजी मुळींच समजत नाहीं. त्यांना इंग्रजी येऊ लागेपर्यंत देशात जागृति करण्याचें काम तुम्ही थांबविणार काय?

तरुण—छेः! तसें मुळींच करता येत नाहीं. तसें केलें तर आजपर्यंत केलेले श्रम फुकट जातील, आणि अनंत काळपर्यंत आपणास कांहींच करता येणार नाहीं. कारण, इंग्रजी भाषा साऱ्या जनतेला समजू लागण्याइतका इंग्रजी भाषेचा प्रसार होण्याला किती युगें लागतील कोण जाणे!

महात्मा—देशी भाषेच्याच द्वारें शिक्षण दिलें जावें असें म्हणणें किती रास्त आहे हें तुम्हाला आता दिसून आलेंच असेल. पण केवळ येवढ्याच एका मुद्यावर देशी भाषाच्या पक्षाची इमारत उभारलेली नाहीं. इंग्रजी भाषा परकी पडल्यामुळें तिच्या द्वारें शिक्षण घेण्यात विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला पुष्कळ महत्त्वाचा काळ निष्कारण खर्च होतो, व मुलाच्या बुद्धीवरहि असह्य ताण बसतो. या ताणाचे त्यांच्या शरीरावर जे परिणाम घडतात त्यामुळें तीं अल्पायुषी होतात. जगलीं वाचलीं तरी त्यांच्या अंगात व बुद्धींतहि जोम राहत नाहीं. आपले पदवीधर निःसत्त्व, निर्बल, निरुत्साही, रोगी, व उथळ मनाचे असतात, याबद्दलचा सगळा दोष शिक्षणपद्धतींतल्या या ठळक व्यंगाला दिला पाहिजे. आमच्या लोकात शोधकशक्ति, विचारशक्ति, साहस, धैर्य, मनाची

दृढता वगैरे गुण नाहींत म्हणून ओरड आहे. ती गैर-वाजवी आहे असें मी म्हणत नाहीं. पण तिच्या मुळाशीं हें कारण आहे हें गेल्या दहापांच वर्षांपर्यंत फारसें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं.

**तरुण**—पण आमची तरुण पिढी निःसत्व होण्याला हेंच कारण विशेषतः आहे हें कशावरून ?

**महात्मा**—जेथें परक्या भाषेंतून शिक्षण देण्याचा वाहिवाट सुरू झाली आहे अशा इतर देशाचासुद्धा हाच अनुभव आहे. दक्षिण आफ्रिकेंतले झिदी लोक मूळचे साहसी, शरीरानें धिप्पाड व सच्छील आहेत. तथापि परक्या डच भाषेंतून त्यांना शिक्षण मिळत गेल्यापासून त्यांची सर्व प्रकारें अवनति झाली आहे. त्यांची शक्ति ऱ्हास पावली; त्यांचें तेज मावळलें; आणि परक्याचें अनुकरण करण्याचें वळण जसें आपणांस लागलें तसें त्यांनाहि लागलें आहे. तेंच जपानाकडे पहा. जपानाचा उत्साहप्रवाह योग्य मार्गानें धावत आहे कीं नाहीं हा प्रश्न निराळा; पण त्या देशाच्या लोकांचें साहस पाहून कोणालाहि त्याचें कौतुकच करावेंसें वाटेल. जपाननें मातृभाषेच्याच द्वारें लोकजागृति केली. यामुळें त्याच्या प्रत्येक कृत्यात कांहीं तरी नवीनपणा—कांहीं तरी स्वतंत्र बुद्धिमत्तेचा विलास—दिसून येतो. ते लोकहि सुधारणेचा धडा इंग्लंड व अमेरिका यासारख्या पाश्चात्य संस्कृतीच्या लोकांपासून शिकले; पण त्यांनीं आपलेपणा सोडला नाहीं

व माकडासारखें परकीयाचें नुसतें अनुकरण करण्यांतच धन्यता मानिली नाहीं, त्यांनीं सुधारणेचे धडे पचविले, त्याचें आपल्या रक्तांत पूर्ण समीकरण करून केलें. पाश्चात्य विद्या जितकी पाहिजे तितकी घेतली, घेऊन तिच्यावर आपला स्वतःचाच छाप त्यांनीं उठविला. त्यामुळें ती आज खुलून दिसत आहे. मातेच्या दुधाबरोबर जे संस्कार आणि जे मधुर शब्द मिळाले असतात त्याच्यात आणि पुढें मिळणाऱ्या शिक्षणात एकतानता राहिली पाहिजे. ती परकीय भाषेच्या द्वारें शिक्षण घेण्यानें राहत नाहीं, व त्यामुळें आपलें जुनें व पूर्वपरंपरागत असतें तें सगळें शिक्षितांना परकें दिसू लागतें, आणि परकीयाविषयीं ममता वाटू लागते! हा अर्थात् मातृद्रोह आहे. पण आपल्या हातून तो दर घडीला घडत आहे! परक्या भाषेच्या द्वारें शिक्षण दिल्यानें होणारा अनर्थ येथेंच थांबत नाहीं. आपल्या देशात शिक्षित वर्ग आणि सामान्य जनता याच्यामध्यें अंतर पडलें आहे, खेड्या पाड्यातल्या लोकांपासून सुशिक्षित वर्ग दूर राहतो व गावढळ लोक बूटपाटलोणवाल्या आपल्या देशी साहेबाना भितात, हा सगळा कशाचा परिणाम! परक्या भाषेतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा याविषयीं मला तरी शंका नाहीं.

तरुण—पण आजच्या काळात इंग्रजी भाषेंतल्या नैपुण्यावाचून जेथे तेथें अडतें. व्यापार, उद्योगधंदे वगैरेंच्या संबंधानें परदेशाशीं दळणवळण ठेवावें लागतें. त्याच्याशीं पत्र-

व्यवहार वगैरे इंग्रजींत करावा लागतो. तेव्हां इंग्रजी शिकणार नाहीं असें म्हणून कसें चालेल?

**महात्मा**—इंग्रजी शिकू नका असें कोण म्हणतो? ऐच्छिक भाषा म्हणून इंग्रजी भाषेचें शिक्षण द्या; परंतु इतर विषयांचेंहि शिक्षण त्याच भाषेच्या द्वारें जें सध्या देण्यांत येत असतें त्यावर सगळा कटाक्ष आहे. आपल्या व्यापारधंद्याच्या उन्नतीला इंग्रजीचें ज्ञान अवश्य आहे तर तें जरूर संपादन करा; पण मातृभाषेची हेळसांड करूं नका; शाळांतून व कॉलेजांतून शिकविले जाणारे इतर विषयहि देशी भाषांच्याच द्वारें शिकवा. जपानी लोकांनीं असेंच केलें. त्यांनीं प्रथम इंग्रज, जर्मन, अमेरिकन वगैरे प्रोफेसर जपानांत नेले तेव्हां त्यांचे कडून इंग्रजीच्या द्वारें ते ते विषय शिकून घेतले. पण पुढें जपानी प्रोफेसर तयार झाल्यावर त्यांनीं जपानी भाषेच्या द्वारें ते विषय शिकविण्याचा क्रम ठेविला.

**तरुण**—पण इंग्रजी ही ऐच्छिक भाषा म्हणून शिकविली तर तिच्या अभ्यासाला थोडा वेळ मिळेल आणि आपले लोक त्या भाषेंत पारंगत होणार नाहींत.

**महात्मा**—सर्वांनींच त्या भाषेंत पारंगत होऊन काय करावयाचें आहे? व्यवहारापुरतें त्या भाषेचें ज्ञान झालें म्हणजे पुरे आहे. ज्यांना त्या भाषेंत पारंगतताच मिळवावयाची असेल तेवढे लोक इंग्रजी भाषेचें ज्ञान वाढविण्या

साठीं विशेष काहीं उपाय योजतील. पुष्कळ इंग्रज लोकांनीं त्यांची मातृभाषा जी इंग्रजी तिच्यातून सर्व शिक्षण घेतलें असताही फ्रेंच वगैरे इतर भाषांमध्यें प्रावीण्य मिळविलें आहे, तसे आपले काहीं थोडे लोक इंग्रजीच्या संबंधानें कर-तील. अशा थोड्या लोकांसाठीं देशी भाषांना शिक्षण क्रमा-तल्या त्यांच्या योग्य स्वाभाविक पदवीपासून भ्रष्ट करून त्यांच्या सिंहासनावर इंग्रजीसारख्या परक्या भाषेची स्थापना करावयाची, आणि साऱ्या जनतेच्या बुद्धीचा कोंडमारा करून शिक्षण म्हणजे 'एक ना धड भाराभर चिंध्या' असा प्रकार करून ठेवून आपल्या मुलांमुलींच्या आयुष्याचें मातेरें करावयाचें, याला शहाणपणा कोण म्हणेल?

**तरुण**—पण देशी भाषा व्यंगपूर्ण आहेत. सर्व विषय—विशे-षतः उच्च शिक्षणक्रमातले विषय—शिकवितांना शब्दांची मोठी अडचण पडेल. देशी भाषांचा पूर्ण विकास झाल्या-शिवाय शिक्षणाचे कामीं त्यांचा उपयोग करतां येणार नाहीं.

**महात्मा**—मला या आक्षेपांत विशेष तथ्य दिसत नाहीं. कोणताहि नवा मार्ग काढला कीं त्यांत अडचणी यावया-च्याच, व प्रसंग येऊन पडला म्हणजे त्या अडचणी टाळून जाण्याचे मार्गहि पण सुचावयाचे, असा प्रत्येक बाबतींत आपणांस अनुभव येतो. भाषा ही काहीं ईश्वरप्रणीत—एकदा ठरून गेलेली—नव्हे ते जसजसा मनुष्याचा व्याप वाढत जातो तसतशी त्याच्या भाषेचीहि वाढ होत जाते. मराठ्यांचें राज्य अटकेपर्यंत जाऊन पोंचलें होतें, तेव्हां त्यांच्या भाषेत क्षात्र-

धर्मासंबंधाचे व दरबारी शब्द फारशी, उर्दू वगैरे भाषांतून गेले. गुजराथी लोकांनीं व्यापारवृद्धीकडे ज्यास्त लक्ष दिलें, त्यामुळें त्यांच्या भाषेंत व्यापारविषयक शब्दांचा जेवढा भरणा झाला तेवढा इतर देशी भाषांतून झालेला दिसत नाहीं. गुजराथी लोकांनाहि ही शब्दाचीच अडचण प्रथम भासली. पण ते डगमगले नाहींत. त्यांनीं ज्या वस्तूंच्या किंवा कल्पनांच्या वाचक परिभाषा आपल्या भाषेंत नव्हत्या त्या दुसऱ्याच्या पासून घेऊन त्यावर आपला छाप मारून काम चालविलें. तसेंच आपल्या देशी भाषांना करावें लागेल. शब्दाच्या अडचणीसाठीं देशकार्य अडू द्यावयाचें कीं काय? देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्यापासून केवढें हित होणार आहे व तें आजपर्यंत न केल्यानें किती अनर्थ व संकटें सहन करावीं लागत आहेत याची पुरी कल्पना थोडक्या काळात आणून देतां येणार नाहीं. पण मीं आतापर्यंत सांगितलें त्यावरून थोडी तरी कल्पना तुम्हास करता येईल. आणखी एक गोष्ट मधाशीं सांगावयाची राहिली, पण ती महत्वाची म्हणून सांगितल्यावाचून माझ्यानें राहवत नाहीं. इंग्रजीच्या द्वारें सुशिक्षित झालेल्या माणसाचा त्याच्या घरच्या माणसांशीं संबंध कसा असतो तो नीट विचार करून पहा. पुरुषांचे विचार निराळ्या तऱ्हेचे, अशिक्षित बायकांचे निराळ्या तऱ्हेचे. अशा पुरुषांना केवळ घरगुती गोष्टींपलीकडे बायकांचें काहीं तरी साह्य देशकार्यांत किंवा समाज-[illegible] शिरण्याची अपेक्षा करता येईल काय? बायकांना तुम्ही इंग्रजी शिकवाल व त्या तुमच्या बरोबरीला येतील तेव्हा त्यांच्याशीं तुमचा विचारविनिमय होणार, व

त्याना समाजकार्य व देशकार्य यांचें महत्त्व कळून मग त्या तुमच्या साह्यास येणार! त्यापेक्षा देशी भाषातून शिक्षण देण्याचा प्रघात पडला म्हणजे तुम्हाला देशी भाषेच्या द्वारें सगळ्या गोष्टी त्याना समजावून देतां येतील व त्यानाहि तुमच्या विचाराविषयीं परकेपणा वाटावयाचा नाहीं. त्या तुमच्याशीं मोकळ्या मनानें चर्चा करू लागतील व तुम्हास साह्य करतील. नायकात व समाजातल्या अशिक्षित समजल्या गेलेल्या वर्गांतहि कांहीं विलक्षण बुद्धीचीं माणसें असतात. पण त्याच्या बुद्धिमत्तेचा समाजाला कांहीं उपयोग करून घेता येत नाहीं. असें म्हणतात कीं आपल्या देशात पावसाळ्याचे दिवसात उत्तुंग गिरिशिखरावरून घो घो खालीं उड्या घेणारे प्रचंड स्रोत जागजागीं आहेत. एखाद्या धाडसी व कुशल इंजिनियरानें त्या प्रवाहाच्या अगच्या प्रचंड शक्तीचा उपयोग करून घेण्याचें मनात आणिलें तर किती तरी कार्य करून घेता येईल! पण आपण ती शक्ति फुकट घालवीत आहों. त्या शक्तीच्या व्यर्थ जाण्याबद्दल ज्याना हळहळ वाटते, त्याना नायकाची व अशिक्षित वर्गाची त्याहूनहि महत्त्वाची आणि अधिक उपयुक्त कार्य करणारी बुद्धिशक्ति फुकट जात असल्याबद्दल मात्र कांहीं खेद वाटत असल्याचें चिन्ह दिसत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय? असो. उशीरानें का होईना, पण लोकाना आता या गोष्टी हळू हळू समजू लागल्या आहेत, आणि प्रांताप्रांतांतून देशी भाषाच्या द्वारें शिक्षण देण्याविषयींची चळवळ सुरू झाली आहे, ही समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे.

# अध्याय सोळावा.

## सत्याग्रह.

**तरुण**—आपण हल्लींच्या काळीं सत्याग्रहाचे आद्य प्रवर्तक आणि मुख्य प्रचारक आहां. सत्याग्रह हा शब्द सध्या सर्वतोमुखीं झालेला आहे. पण त्याचें खरें रहस्य फार थोड्याना नीट रीतीनें व स्पष्टपणें सागता येतें असा माझा अनुभव आहे. म्हणून तें रहस्य आपल्या मुखातून निघालेलें श्रवण करावें अशी फार इच्छा आहे. कृपा करून ती पूर्ण करावी. प्रथम मी हें आपणास विचारतों कीं इग्रजींत ज्याला Passive Resistance अथवा निःशस्त्र प्रतिकार म्हणतात तो आणि सत्याग्रह एकच काय?

**महात्मा**—नाहीं. Passive Resistance हा शब्द शारीरिक शक्तीच्या उपयोगाचा अभाव सुचविणारा आहे. 'सत्याग्रह' या शब्दानें जेवढा अर्थ सूचित होतो तेवढा त्या इग्रजी शब्दानीं होत नाहीं. सत्याग्रहात आत्मिक तेजाचा—बलाचा—सबंध येतो. हा सबंध त्या इग्रजी शब्दानीं सूचित होत नाहीं. म्हणून सत्याग्रह व Passive Resistance हे एक नव्हेत.

**तरुण**—आपल्या सत्याग्रहाचें मूलतत्त्व काय आहे?

**महात्मा**—अगदीं थोडक्यात सागावयाचें म्हणजे सत्याग्रहाचें

रहस्य ' जीवनातील तत्त्वाचें शोधन करणें ' हें आहे. आपल्या ठायीं परमेश्वरानें आत्मिकबळ ठेविलें आहे, आणि तें शरीरबळापेक्षा व शस्त्रबळापेक्षां अनंत पटीनें श्रेष्ठ आहे. या बळानें आपण अजिंक्य होऊं शकतों. पण गमत ही आहे कीं येवढी प्रचंड शक्ति परमेश्वरानें दिली असताहि मनुष्यास ती आपल्याजवळ आहे हें न कळल्यामुळें त्याला वाटतें कीं आपण दुर्बळ आहों. बलिष्ठानें आपले कान धरून वाकविलें तर वाकण्यापलीकडे आपणास कांहीं करता येणें शक्य नाहीं. जसें एखाद्या श्रीमंत पित्यानें आपल्या अज्ञान मुलाची आपल्यामागें योग्य तजवीज रहावी म्हणून गुप्तधन ठेवावें, पण तें कोठें ठेविलें आहे या विषयींचा शोध न करता त्या मुलानें भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा, तशी आपली स्थिति आहे. खरोखर परमेश्वर अत्यंत न्यायप्रिय आणि मायाळु आहे. माणसानें दुर्बळ राहून दुसऱ्याकडून होणारे अन्याय मुकाट्यानें सहन करावे अशी त्याची मुळींच इच्छा नाहीं. म्हणूनच त्याने माणसाला आत्मिक बळ देऊन ठेविलें आहे. त्या बळाचे जोरावर त्याला त्या अन्यायाचा प्रतिकार करून विजयी होता येतें. पण हें बळ कोठें ठेविलें आहे तें मात्र शोधून काढण्याची तसदी त्या माणसानें घेतली पाहिजे. हा शोध लावणें हेंच सत्याग्रही माणसाचें कर्तव्य आहे.

**तरुण**—पण हा शोध लावायचा कसा?

**महात्मा**—तेंच मी आता व्यावहारिक दृष्टांतानें स्पष्ट करणार आहें. कोणत्याहि अन्यायाचा प्रतिकार करण्याचे दोन

प्रकार आहेत. एक–अन्याय करणाराचें डोकें फोडणें, आणि तसें करण्यात स्वत चेंहि डोकें फोडून घेणें हा; व दुसरा-दुसऱ्याचें डोकें फोडण्याची इच्छा न धरतां स्वत चेंच डोकें फोडून घेऊन सत्याला जयप्राप्ति करून देणें हा. पैकीं पहिलाच प्रकार जगात जिकडे तिकडे लोक स्वीकारतात. या प्रकारात जय-प्राप्ति झाली तरी तिचा परिणाम अवनतिकारक होतो. विजयी माणसाला मद चढून त्या उन्मादाचे पायीं त्याच्या हातून अनीतीचें आचरण घडू लागतें. युद्धाचें बीज त्यानें नष्ट होत नाहीं. देशात शातता स्थापित झाली तरी ती फार वेळ टिकत नाहीं. त्यामुळें विजय प्राप्त झाला तरी सुख प्राप्त होत नाहीं. पण सत्याग्रहाचा म्हणून जो दुसरा प्रकार सागितला त्यात आत्मसमर्पणाच्या तत्त्वावर विजयप्राप्ति होत असल्यामुळें त्या जयप्राप्तीनतर विजयी मनुष्य मदांध होण्याची व अनीतियुक्त आचरण करून अधोगतीला जाण्याची भीती नाहीं. सत्याग्र-हानें विग्रहाचें बीजच उरत नाहीं. अर्थात् शाततेचा भग होण्याची भीती राहत नाहीं.

**तरुण**–या प्रकाराला सत्याग्रह असें नाव का देण्यात आलें ?

**महात्मा**–कारण, या प्रकारानें अन्यायाशीं झगडणाराचें बळ सत्याविषयींचा आग्रह हेंच असलें पाहिजे. त्या माणसाने सत्याचाच आश्रय केला पाहिजे. सत्यासाठीं तरवारीचे घाव सोसण्यांत जी मर्दुमकी आहे ती तरवार मारण्यात नाहीं असा दृढ विश्वास त्याच्या ठायीं असला पाहिजे. सत्याग्रह हा अहिंसाधर्म असल्यानें तो सर्व धर्मांना मान्य आहे.

**तरुण**—आपण कांहींहि म्हणा, पण दुसरा अन्यायानें तरवार चालवीत असता त्याचा हात धरून उलट तरवारीचे प्रहार करण्यात जें शौर्य आहे तसें ते प्रहार सहन करण्यात नाहीं असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें.

**माहत्मा**—तुम्ही येथें चुकता. सत्याची बाजू सभाळून घरण्यासाठीं पडतील ते कष्ट सहन करण्यास तयार होणाऱ्या सत्याग्रही माणसाच्या अंगीं रणांगणावर लढणाऱ्या शिपायाहूनहि अधिक शौर्य लागतें. कारण, शस्त्रवीराचें शौर्य तत्कालिक स्फुरणानें उत्पन्न झालेलें असतें; सत्याग्रही वीराला सतत दुःख सहन करण्याची तयारी ठेवावी लागते. त्याला रात्रंदिवस युद्ध करावें लागतें, आणि तेंहि नुसत्या बाह्य शत्रूशींच नव्हे, तर अंतःस्थ शत्रूशींहि करावें लागतें. म्हणूनच सत्याग्रह हा शरीरबलापेक्षा अधिक तेजस्वी असतो. सत्याग्रही माणसाला कशाचीच—मरणाची सुद्धा—भीती वाटत नाहीं.

**तरुण**—मी समजत होतों कीं सत्याग्रह हा अन्यायाचा प्रतिकार करण्याचा मार्ग आपण नवीन शोधून काढला आहे. पण आपण नुकतेंच बोलून गेला कीं तो सर्व धर्मांना मान्य आहे. यावरून तो जुनाच असला पाहिजे असें दिसतें. जुना असला तर सत्याग्रहाला धर्मशास्त्रात व इतिहासपुराणात आधार असला पाहिजे.

**महात्मा**—सत्याग्रह आणि शस्त्रयोग हे दोन्ही उपाय अनादि आहेत; नवे नाहींत. श्रीमद्भगवद्गीतेत दैवी आणि

आसुरी अशा ज्या दोन संपत्ति सांगितल्या आहेत त्यांचींच हीं रूपें आहेत. भारतवर्षांत दैवी संपत्तीचें प्राधान्य होतें. अजूनहि आपला आदर्श तोच आहे. आसुरी संपत्तीच्या आदर्शांचें प्राधान्य पाहावयाचें असलें तर युरोपच्या स्थितीकडे पहा. थोड्या वेळापूर्वी भारतीय सुधारणा व पाश्चात्य सुधारणा यांच्यांतला भेद मी तुम्हाला सांगितला तो या आदर्शांच्या भिन्नतेमुळेच उत्पन्न झालेला आहे. सर्व धर्मांनीं सत्याग्रहालाच मान्यता दिली आहे याबद्दल प्रमाणें हवीं तेवढी देता येतील. इतिहास व पुराणें या ग्रंथांतून व अर्वाचीन इतिहासांतून देखील सत्याग्रहाचे उज्ज्वल दृष्टांत विपुल आहेत. बौद्ध व जैन धर्मांत अहिंसा तत्त्वाच्या पालनार्थ माणसानें लागेल तेवढा आत्मत्याग करण्यास तयार व्हावें, पण सत्याची कास सोडूं नये व हिंसा करूं नये, अशा स्पष्ट आज्ञा आहेत; ख्रिस्ती धर्माचा मुख्य प्रवर्तक जो येशू ख्रिस्त त्याचें सबंध चरित्र सत्याग्रहमय आहे. आपल्या इतिहास पुराणादि ग्रंथांत महान् भगवद्भक्त प्रल्हाद याच्या चरित्रापेक्षां सत्याग्रहाचें अधिक उज्ज्वल चित्र तुम्हास कोठें सांपडेल? अलीकडच्या काळात महान् साध्वी मिराबाई हिचें उदाहरण इतिहासात सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेविलेलें आहे तें पहा. पुष्कळ लोक म्हणतात कीं मुसलमानी धर्माची उन्नति तरवारीच्या जोरावर झाली. माझी समजूत याच्या अगदीं उलट आहे. मला असें वाटतें कीं तरवारीच्या जोरा-

वर झाली नाहीं तर इस्लामी फकीराच्या आत्मसमर्पणाच्या —त्यांनीं सत्यासाठीं दिलेल्या प्राणांच्या आहुतीच्या—प्रभावा-मुळें झाली. इमाम हुसेन व त्याचे सोबती यास अन्यायाची वाटत असलेली गोष्ट करण्याचें एकदां फर्मावि‌ण्यांत आलें होतें. तेव्हा त्यांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. आपल्या-पुढें मरण उभें आहे हें त्यावेळीं त्याना पूर्णपणें ठाऊक होतें. तरी पण आपण अन्यायाला वश झालों तर आपल्या पुरुषार्थाला बट्टा लागेल, आपण धर्मभ्रष्ट होऊं, या पवित्र विचारानें त्यानीं मरण पतकरलें, पण अन्यायी हुकुमाला ते वश झाले नाहींत. अशा सत्याग्रही माणसाच्या एखाद दुसऱ्या उदाहरणाचा जो प्रभाव लोकावर पडतो त्याचा शतांशहि शस्त्रबळाचा पडत नाहीं. अशा सत्याग्रही माण-साच्या अगच्या तेजापुढें चक्रवर्ति राजाचे तेजहि फिकें पडतें. त्याला सुद्धा सत्याग्रहापुढे नमावें लागतें. पाश्चात्य देशांतहि काहीं सुप्रसिद्ध सत्याग्रही होऊन गेले आहेत. त्यांनीं सत्या-ग्रहाचें तत्त्व वाकड्या मार्गानें जाणाऱ्या समाजाच्या विरुद्ध उपयोगांत आणिलें होतें. 'कायद्याचा भग करण्याचें कर्तव्य' या पुस्तकाचा लेखक थोरो याला गुलामाचा व्यापार बद करण्यासाठीं स्वजातीच्या विरुद्ध सत्याग्रहाचें व्रत स्वीकारावें लागलें होतें. मार्टिन् लूथर हा धर्माच्या शुद्धतेसाठीं सत्याग्रह स्वीकारून रोमन क्याथोलिक मताचे शकराचार्य जो रोमचा पोप (ज्याच्या आज्ञा मोठाले बादशहा सुद्धां निमूटपणें

पाळीत ) त्याच्या विरुद्ध गेला. ग्यालीलिओ, व कोलंबस यांचींहि उदाहरणें सत्याग्रहाचीं म्हणून देता येतील. सत्याग्रहानें आजपर्यंत जगांत किती तरी मोठालीं कार्यें घडून आलीं आहेत! सत्याग्रह ही मनाची एक अपूर्व स्थिति आहे. ती ज्याला प्राप्त झाली तो सर्वदा व सर्व स्थितींत विजयीच असावयाचा. त्याच्यापुढें कोणाचींहि मात्रा चालावयाची नाहीं. असल्या दिव्य मन्त्राची ओळख हिंदुस्थानाला अजून पटली नाहीं. म्हणून तो लाचार व निर्वीर्य स्थितींत आहे. ही निर्वीर्यता राजकीय बाबतींतच आहे असें नाहीं, सर्वच बाबतींत ती दिसून येते. सत्याग्रहाचा अवलंब केल्यानें सर्व सुधारणा आपणास सत्वर घडवून आणता येतील.

तरुण—सत्ताधारी अन्यायानें वर्तन करू लागले तर सत्याची कास धरून आत्मिक बळानें त्यांना ताळ्यावर आणणें याचें नांव सत्याग्रह व तो करतांना पडतील ते कष्ट सोसण्यास व वेळीं प्राणसुद्धां अर्पण करण्यास जो तयार होईल तो खरा सत्याग्रही हें मला आतां पूर्णपणें समजलें. आतां हें तत्त्व व्यवहारांत कसें उपयोगांत आणावयाचें तें समजून घेण्याची माझी इच्छा आहे.

महात्मा—फार चांगलें. मी आतां व्यावहारिक दृष्टांत घेऊन सांगतों तें अगदीच लक्षपूर्वक ऐका. समजा, सरकार

---

प्रजेला कःपदार्थ समजून भलभलते कायदे लोकांना छळून टाकण्यासाठीं करू लागलें, तर ज्याला न्यायाविषयीं प्रीति

व सत्याची चाड आहे त्याच्या अंतःकरणाला संताप व चीड आल्यावाचून राहणार नाहीं. उदाहरणार्थ, समजा सरकारनें कायदा केला कीं काळ्या लोकांनीं पिंवळी टोपी घातली पाहिजे. एक वेळ रोममध्ये यहुदी लोकांसाठीं असा कायदा करण्यात आला होता. या कायद्याचा हेतु आपणास नीच समजून आपला उपमर्द करण्याचा असेल तर सरकारला स्पष्टपणें दाखविले पाहिजे कीं तुमचा कायदा सत्याला व न्यायाला विरुद्ध असल्यामुळें आम्हाला तो मान्य नाहीं. आम्ही तुमच्या जुलुमी कायद्यापुढें मान वाकविणार नाहीं. प्रजेवाचून राज्य संभवत नाहीं. जोंपर्यंत राजाचीं योग्य कर्तव्यें न्यायानें तुम्ही करीत रहाल तोंपर्यंतच आम्ही तुमच्याशीं प्रजाधर्मानें वागू. पण जर तुम्ही असे भलभलते अन्यायाचे कायदे करून प्रजेचा उपमर्द कराल, दगलबाजीनें आम्हास चिरडून टाकूं पहाल, तर तुमचा आमचा पूर्वसंबंध तुटेल. तुमचे कायदे तुमच्या पुस्तकांतच राहतील. आम्ही ते पाळणार नाहीं. त्या बद्दल जी शिक्षा कराल ती भोगायला आम्ही तयारच आहों. तुरुंगात पाठवाल तर तेथें स्वर्ग समजून राहू. फांशीं चढ-वाल तर सुखानें हसतमुखानें फांसावर चढू. आमच्यावर दुःखाचा जेवढा वर्षाव कराल तेवढा सर्व शांतपणानें सहन करू. पण तुमच्या केसालाहि धक्का लावणार नाहीं, आणि या कुडींत प्राण असेपर्यंत तुमच्या जुलुमी कायद्याची अम-लबजावणीहि आमच्यावर करू देणार नाहीं.

**तरुण**–मी मध्येंच बोलतों याची क्षमा करा. पण शंका आली ती लागलीच विचारून टाकतों. सरकार जे कायदे करतें ते प्रजेच्या हितासाठींच असतात अशी माझी समजूत आहे, व ते पाळणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे असें मी समजतों. हे कायदे अन्यायाचे वाटल्यामुळें जर प्रजा सरकारला ते कायदे मोडण्याची धमकावणी देऊं लागली तर अराजकताच झाली म्हणावयाची! मग कसलें राज्य आणि कसली शांतता आली आहे! राज्यावर व प्रजेवरहि अशी आपत्ति येऊं देणें इष्ट आहे काय?

**महात्मा**–या शंकेंत कित्येक गोष्टी तुम्हीं गृहीत धरल्या आहेत. तुम्हाला जगातल्या व्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं हें त्याचें कारण असावें. कायदे करणाऱ्याच्या हातून कधीं चूक होत नाहीं, राज्यकर्ते स्वतःची प्रतिष्ठा किंवा अधिकार वाढविण्यासाठीं किंवा कायम राखण्यासाठीं प्रजेला दडपून टाकण्यासारखे कायदे करीत नाहींत, व कायदे करताना व त्याची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्याची दृष्टि नेहमीं उदारपणाची न्यायाची व प्रजेच्या हिताकडेसच असते, असें जें तुम्हीं गृहीत धरलें आहे तेंच मुळीं चुकीचें व अनुभवाच्या विरुद्ध आहे. ज्या कायद्यांना सत्याचा, व न्यायाचा आधार नाहीं, ज्यांची रचनाच मुळीं अशुद्ध व अपवित्र हेतूनें झालेली आहे असे जुलमानें लादलेले कायदे आंधळेपणानें पाळणें हें नागरिकाच्या कर्तव्यात मुळींच येत

नाहीं. अशा वेळीं सरकारला ते कायदे रद्द करण्याविषयीं योग्य प्रकारें विनति करून त्यांनीं ती न मानल्यास सत्याग्रहाचा अवलंब करून अधिकाऱ्याची चूक त्याच्या नजरेस आणणें व त्यांना ती दुरुस्त करण्यास लावणें हीच खरी राज्याची सेवा आहे. सत्याग्रह राज्यावर आपत्ति आणीत नाहीं, भावी आपत्ति टाळण्यास मदत करतो. अंध राजनिष्ठेपेक्षा अशा प्रकारची राजनिष्ठा ही श्रेष्ठ प्रतीची आहे, हें कोणीहि कबूल करील.

तरुण—सत्याग्रही माणसाच्या अंगीं कोणकोणते गुण असले पाहिजेत ?

महात्मा—पहिला आणि मुख्य गुण म्हणजे जाज्वल्य सत्यनिष्ठा पाहिजे. असत्याचें वारें त्यानें घेतां कामाचें नाहीं. लोकप्रीति संपादन करण्यासाठीं किंवा कीर्तिलाभाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि लाभाच्या इच्छेनें त्यानें सत्यास झुगारून देऊन असत्याचा पक्ष धरतां नये. दुसरा गुण म्हणजे पैशाविषयीं बेफिकीरी. संपत्ति व सत्य यांच्यामध्यें बहुधा छत्तिसाचा आकडा असतो. सत्याग्रही माणसाला पैसा मिळाला तरी तो त्याच्याजवळ सहसा टिकत नाहीं. कारण, राजाचें बळ सत्याग्रही माणसाच्या मनावर चाललें नाहीं तरी त्याच्या संपत्तीवर चाललें. त्याची मालमिळकत जप्त करतां येते. तिसरी गोष्ट—सत्याग्रही माणसाला कुटुंबाची माया सोडावी लागते. हें काम फार कठीण आहे; असिधारा व्रताइतकें

किंवा तीव्र तपश्चर्येइतकें कठीण आहे. पण परमेश्वराच्या ठायीं पूर्ण श्रद्धा असली, ज्यानें जीव निर्माण केला त्यानें त्याच्या निर्वाहाचीहि पण योग्य तजवीज करून ठेविलीच आहे, त्यालाच त्या जिवाची फिकीर आहे, आपल्या काळजीनें काय होणार? असे म्हणून चित्त शांत ठेविलें, म्हणजे ती चिंता कमी होते. सारांश, सत्याग्रही मनुष्य पूर्ण धार्मिक वृत्तीचा व सात्त्विक असला पाहिजे. त्याला कोणतेंहि व्यसन नसावें; अगदीं साध्या राहणीनें राहण्याची किंबहुना विपत्तीची सवय असावी. नाजूकपणा त्यानें सोडला पाहिजे. कारण, कोणत्या वेळीं कशी विपत्ति भोगण्याचा प्रसंग त्याच्यावर येईल याचा नियम नसतो. सारांश, ही एक तपश्चर्या आहे, आणि तपश्चर्येसारखीच हिची फलश्रुतिहि पण मोठी आहे. जो खरा धर्मनिष्ठ असेल तोच सत्याग्रही होऊं शकेल. सत्याग्रही माणसाची परमेश्वरच आपला आधार आहे अशी पूर्ण निष्ठा असते. परमेश्वरहि अशा भक्ताला सर्व क्लेश शांतपणानें सहन करण्याचें बळ देऊन अखेर त्याला विजयी करतो. भक्ताची लाज परमेश्वराला असते. 'न मे भक्तः प्रणश्यति' ही गीतोक्ति अशा भक्ताविषयीं अक्षरशः खरी ठरते.

तरुण–पण अशा भक्ताला परमेश्वरानें क्लेश सहन करावयास लावून दुःख तरी का द्यावें?

महात्मा–कसोटीला उतरल्यावांचून परमेश्वर एखाद्यावर

उगाच कृपा करील कसा? तो अत्यंत न्यायी आहे. कसो-टीला उतरेपर्यंतच सत्याग्रही माणसाला काय क्लेश होतील तेवढे, आणि ते सुद्धा क्लेश असे वाटत नाहींत. कारण, आपण सत्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करीत आहों हें मनाचें समाधान त्याला असतेंच. आणि मनाचें समाधान हेंच सुख. सुख हें निराळें काय असतें? हें सुख परमावधीचें असतें. त्यापुढें इतर सुखें तुच्छ होत. म्हणून प्रत्येक हिंदी माणसानें सत्याग्रही बनावें अशी माझी इच्छा आहे. सर्व अन्याय व दुःखें पार घालवून देणारें हें अपूर्व साधन आहे. याचा उपयोग हिंदुस्थानाला फार होईल. फक्त त्याचें खरें स्वरूप समजलें पाहिजे.

**तरुण**—आपण म्हणतां अशा प्रकारचे सत्याग्रही वीर फारच दुर्मिळ असतील. दक्षिण आफ्रिकेंत असे सत्याग्रही वीर आपणास किती आढळले?

**महात्मा**—शस्त्रवीरसुद्धा थोडेच असतात, मग सत्यवीर तर त्याहूनहि कमी असणार हें उघडच आहे. पण नाहींत असें मात्र नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत अशिक्षित माणसांत व आपण ज्यांना अबला समजतों अशा बायाबापड्यांत सुद्धा थोडीं कां होईना, पण खरीं सत्याग्रही माणसें निघालीं. हीं माणसें सर्वांना खरो-खर वंद्य होत. सत्याग्रहाचें शुद्ध पवित्र स्वरूप समजणारे व त्याची किंमत जाणणारे थोडे व मारामाऱ्या आणि अत्याचार करण्यास उद्युक्त होणारे, अशुद्ध हेतूनें प्रेरित, केवळ नावाचेच

सत्याग्रही अशांची संख्या तिकडे मोठी होती, यामुळेंच तिकडे सत्याग्रहाची चळवळ यशस्वी होण्यास उशीर लागला. इकडे थोड्या दिवसांपूर्वी रौलेट कायद्याविरुद्ध मी सत्याग्रह पुकारला, तेव्हांहि हाच अतिशय दुःखदायक अनुभव मला आला. यावेळीं लोकांनीं जे अत्याचार केले त्यांनीं माझ्या अतःकरणावर जे घाव पडले ते लवकर बुजणार नाहींत. माझ्या देशबंधूंकडून हिंदभूमीच्या शीलास कालिमा लावणारें असें वर्तन घडेल अशी मला अगोदर कल्पनाहि झाली नव्हती त्यामुळें माझ्या हातून सत्याग्रह पुकारण्यात उतावीळपणा झाला. ती माझी घोड्यायेवढी चूक झाली म्हणून ती माझ्या नजरेस येतांच मी सत्याग्रहाची चळवळ एकदम बंद केली हें तुम्हास ठाऊक आहेच. तथापि मी निराश झालों नाहीं. लोकांना सत्याग्रहाचें खरें स्वरूप समजावून सांगून व स्वतः त्याचें उदाहरण घालून लोकाना त्याचे शिक्षण देईन अशी मला अद्याप उमेद आहे. माझी बालबाल खात्री आहे कीं आज नाहीं उद्यां मी ही चळवळ यशस्वी करून दाखवीन. परमेश्वरानें तें करण्याचें सामर्थ्य मला द्यावें व माझ्या हातून येवढी देशसेवा घडवावी अशी मी त्याची सदासर्वदा अंतः-करणपूर्वक प्रार्थना करीत असतों.

# अध्याय सतरावा.

## हिंदुस्थानचें दारिद्य.

तरुण—इग्रजी अमलाखालीं हिंदुस्थान दरिद्री होत आहे कीं भरभराटत आहे?

महात्मा—तो दरिद्री होत आहे यांत मला बिलकुल शंका वाटत नाहीं. जो देश कच्चा माल बाहेर पाठवून परदेशांत बनलेला पक्का माल घेतो, तो देश भुकेबगाल कसा नसेल? ज्या देशातील मोठाल्या पगाराचा विशेष भाग परदेशात जातो तो देश दिवसेंदिवस कगाल बनलाच पाहिजे. ज्या देशातले लोक थंडीपासून सरंक्षण करण्यासाठीं ऊबदार वस्त्रें घेण्याची ऐपत नाहीं म्हणून सोन्यासारखें खत शेकण्यासाठीं वापरतात तो देश अठरा विश्वें दरिद्री असलाच पाहिजे. लोकाची प्राप्ति वाढली नाहीं, पण खर्च मात्र मनस्वी वाढला आहे. अशी स्थिति असता प्रजेची आर्थिक उन्नति होत आहे असें सरकारी अधिकारी म्हणत आहेत! म्हणोत बिचारे! मला तर हिंदुस्थानच्या वाढत्या दारिद्याविषयीं इतकी खात्री आहे कीं प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें खालीं उतरून भलतेंच सांगितलें तरी मी म्हणेन कीं हिंदुस्थान दारिद्री होत आहे असें मला प्रत्यक्ष दिसत आहे तोंपर्यंत मी दुसऱ्या कोणाचें म्हणणें खरें मानणार नाहीं.

तरुण—आपल्या आतांच्या भाषणांत मला अनेक शंका-स्थानें दिसतात. पहिली शंका ही कीं हिंदुस्थानांतून जो कच्चा माल बाहेर जातो त्याच्या मोबदला त्याला इतका भरपूर मिळतो कीं होम-चार्जेस (म्हणजे हिंदुस्थानाप्रीत्यर्थ विलायतेंत होणारा खर्च ) वगैरे जाऊन कित्येक कोट रुपयाचें चांदी सोनें हिंदुस्थानांत येतें असे इंग्रज लेखक सरकारी रिपोर्टांतल्या आंकड्यांवरून दाखवितात. दरसाल इतकी संपत्ति बाहेरून ज्या देशांत येते तो देश दरिद्री होत चालला आहे असें कसें म्हणतां येईल ?

महात्मा—अहो, ही शुद्ध आंकड्याची फसवेगिरी आहे. हें आंकड्यांचें इंद्रजाल मोठमोठ्या विद्वानानाहि फसवितें, मग तुमच्यासारख्या अननुभवी तरुणाची काय कथा ? तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें दरसाल पुष्कळ चांदी सोनें हिंदुस्थानांत येतें ही गोष्ट रिपोर्टांत लिहिली आहे व ती खरीहि असेल. पण हें सोनें कोणाच्या खिशांत जातें ते रिपोर्टांत लिहिलें आहे काय ? हिंदुस्थानांतून परदेशीं जाणारा विशेष किंमतीचा माल म्हणजे कॉफी, धान्यें, ताग, कापूस, कातडीं, अफू, गळिताचीं धान्यें इ. होय. या सगळ्या जिनसांचा व्यापार कोणाच्या हातांत आहे ? युरोपियनाच्या ना ? अर्थात् त्या व्यापारांत होणारा सगळा नफा त्याच्या खिशांत जातो. आयात मालाचा सगळा व्यापारहि याच लोकाच्या हातांत आहे. मग या दोन्हीकडच्या व्यापारांत होणारा नफा सोनें चांदी

च्या रूपानें हिंदुस्थानांत येत असला तरी तो या युरोपियन कंपन्यांना मिळतो. या कोट्यवधि म्हणजे कापसें हिंदुस्थानचे ... नाहीं इतका फायदा हिंदुस्थानच्या लोकांच्या पदरांत खरोखर पडता तर हिंदी माणसाची सरासरी वार्षिक प्राप्ति सारी १८ रुपयेच कां राहती ? आणि देशांत वारंवार दुष्काळ कां पडते ?

**तरुण**—हिंदुस्थानचे लोक आळशी म्हणून त्यांची अशी स्थिति असण्याचा संभव आहे.

**महात्मा**—हिंदुस्थानचे लोक आळशी ही गोष्ट अगदीं खोटी आहे. बिचारे दिवसभर काबाडकष्ट करण्यास व अल्प वेतनावर संतुष्ट राहण्यास तयार असतां त्यांना काम मिळत नाहीं म्हणून त्याच्या शोधासाठीं ते इकडे तिकडे हिंडत असतात. आपले देशांत काम मिळत नाहीं म्हणून वसाहतींत मजूरी करायला सुद्धां जातात घरीं त्यांना पोटभर खायला मिळतें तर विटंबना करून घ्यायला ते परदेशीं गेले असते काय ? तुम्हीच सांगा.

**तरुण**—पण हिंदुस्थान देश इतका विस्तीर्ण आहे, येथें लक्षावधि एकर जमीन पडीत पडली आहे, नाना तऱ्हेचे उद्योग करतां येण्यासारखे आहेत, असें असतां लोक निरुद्योगी कां राहावे व काम नाहीं म्हणून परदेशास जाण्याची पाळी कां यावी हा विचार करण्यासारखा प्रश्न नाहीं काय ?

**महात्मा**—होय, आहे खरा. पण तो विचार तुम्हीं आम्हीं कफल्लक लोकांनीं करण्यासारखा नाहीं. सरकारनें व कोट्याधी-

ळ्यानीं करण्यासारखा आहे. पडीत जमिनी लागवडीस आण-ण्याला मोठें भांडवल लागतें, व सरकारी अधिकाऱ्याचें पूर्ण साह्य हवें असतें. या दोन्ही गोष्टींची येथें अनुकूलता नाहीं. लोकाना उद्योगधंद्यांचें शिक्षण मिळत नाहीं. आमच्या विचित्र शिक्षणपद्धतीमुळें आमच्यातलें धाडस नष्ट झालें आहे. आणि यान्त्रिक कारखाने वाढल्यामुळें मनुष्यबळाचें विशेषसें कारण न उरल्या कारणानें लक्षावधि लोकावर निरुद्योगी होऊन उपासमार सोसण्याची पाळी आली आहे. या सर्व लोकाना जरूर काम मिळतें तर हिंदूस्थानची संपत्ति किती वाढली असती याची काहीं कल्पना तुम्हास करता येते काय ?

तरुण–नाहीं.

महात्मा–मी सांगतों, आणि तेंहि माझ्या पदरचें सांगत नाहीं. सरकारी अधिकाऱ्यानीं केलेल्या रिपोर्टांच्या आधारा-नेंच सांगतों. सन १८८० या वर्षी सर जेम्स केरोल हे फॅमिन कमिशनरच्या हुद्यावर नेमणूक होऊन इकडे आले होते. त्यानीं इकडची स्थिति पाहून जो रिपोर्ट केला त्यात म्हटलें आहे कीं काम करण्यासारखे असे २॥ कोटि पुरुष (बायकांची संख्या निराळीच) काम मिळत नाहीं म्हणून वर्ष भर रिकामे राहत आहेत. हिंदुस्थानासारख्या केवळ शेतकी-वर निर्वाह करून राहणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि देशात निरु-द्योगी लोकाची येवढी मोठी संख्या दिसत नाहीं. रस्ते, बाजार, आगगाडीचें स्टेशन, वगैरे जिकडे पहाल तिकडे

रिकाम्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी दिसतात. खेडेगांवांत केव्हांहि जा, तुमच्या भोंवतीं रिकामे लोक जमा झालेच समजा. हे इतके लोक रिकामे राहण्याचें कारण शेतकी-शिवाय दुसरा धंदा लोकांना राहिला नाहीं हें एक, व शेत-कीची धारापद्धति अनिश्चित स्वरूपाची आहे हें दुसरें कारण आहे. या लोकांच्या अंगची जी शक्ति व उत्साह फुकट जात आहे त्याची पैशाच्या स्वरूपांत किंमत केली तर किती होते पहा! फार राहिलें, पण प्रत्येक माणूस वर्षभरांत ४० रुपयांचेंच काम करतो असा हिशोब धरला तरी कमींत कमी ८२ कोट रुपयांच्या उत्पन्नास हिंदुस्थान दरसाल मुकत आहे! आणि ही ४० वर्षांच्या पूर्वीची स्थिति. आतां देशांत यांत्रिक कारखाने आणखी आले आहेत, आणि त्यांनीं मजु-रांच्या तोंडचें अन्न काढून लक्षावधि लोकांना उपासमार सोसण्यास मोकळें सोडलें आहे.

तरुण—हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या संबंधाचा हा मुद्दा खरोखर अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि आश्चर्य आहे कीं आपल्या पुढारी मंडळीचें लक्ष अद्याप या मुद्याकडेस जावें तसें गेलें नाहीं. उलटें यांत्रिक कारखाने वाढविण्याच्याच उद्योगांत ते आहेत! या दृष्टीनें पाहिलें म्हणजे यांत्रिक कार-खान्याच्या विरुद्ध जी आपली तक्रार आहे ती अगदीं वा-जवी दिसते. आपल्या या एकंदर विवेचनावरून हिंदुस्थान दिवसें दिवस दरिद्री होत चालला आहे याविषयीं कोणा-लाहि शंका राहण्याचें कारण दिसत नाहीं. दोन अडीच

कोट पुरुष व तितक्याच बायका मिळून हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येचा एक षष्ठांश होतो. येवढा जनसमाज काम मिळत नाहीं म्हणून रिकामा राहत असता आमचे लोक पाश्चात्य सुधारणेच्या भपक्याला भुलून व फ्याशनच्या नादीं लागून पाश्चात्यांच्या व्यापाराला उत्तेजन देत राहिलेले पाहून आमच्या लोकांच्या मूर्खपणाची कींव करावी तेवढी खरोखर थोडी वाटते.

# अध्याय अठरावा.

## स्वदेशी.

तरुण—हिंदुस्थानच्या दरिद्री स्थितीचें चित्र पाहिलें म्हणजे अंतःकरणांत कसें भडभडून येतें! ही स्थिति पालटण्याचा कांहींच उपाय आपल्या हातीं नाहीं काय?

महात्मा—नाहीं कसा? आहे, आणि तो करण्यास तुमच्यासारखी तरुण मंडळी तयार होऊन उदाहरण घालून देतील, तर लवकरच त्याचा प्रसार साऱ्या देशभर होईल.

तरुण—असा उपाय कोणता?

महात्मा—स्वतः हातानें सूत काढण्यास व हातमागावर कापड विणण्यास लागणें, आणि अशा रीतीनें इकडे पिकविलेल्या कापसाचें, हातानें सूत काढून त्याचें हातमागावर विणलेलें, कापडच आपण वापरूं असा सर्वांनीं निश्चय करून तो पाळणें हा होय.

तरुण—म्हणजे स्वदेशीव्रताचा पुनरुद्धार करणें असेंच कां म्हणा ना? पण हा उपाय मागें बंगालच्या फाळणीच्या वेळीं बंगाल्यांतल्या व इतर प्रांतांतल्या लोकांनीं करून पाहिला होता. तो सिद्धीला गेला नाहीं. उलट नसतीं लचांडें मात्र त्यापासून उत्पन्न होऊन लोकांना त्रास झाला होता हें आपणास ठाऊकच आहे.

महात्मा—तेव्हांची स्वदेशी चळवळ सिद्धीला गेली नाहीं याला माझ्या मतें दोन कारणें होतीं. एक तर ती चळवळ केवळ स्वदेशहित करण्याच्या शुद्ध व पवित्र बुद्धीनें निघालेली नव्हती. परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचा—अर्थात् परद्वेषाचा—अशुद्ध व अपवित्र हेतु त्यांत मिश्रित होता. शिवाय बहिष्कारानें इंग्रजी व्यापाऱ्यांचें नुकसान करून त्यांच्याकडून सरकारला फाळणी रद्द करण्यास भाग पाडावें असा राजकीय उद्देश त्या चळवळीच्या बुडाशीं होता. त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांशीं त्या चळवळीचा संबंध येऊन नसत्या भानगडी उपस्थित झाल्या. दुसरें आणखी एक कारण असें झालें कीं त्या वेळीं लोकांनीं सर्वच जिनसा देशी वापरण्याचा निश्चय करून आकाशाला गवसणी घालण्यासारखें फार प्रचंड काम एकाएकीं हातीं घेतलें आणि तें आपल्या शक्तीबाहेरचें आहे असें त्यांना लवकरच दिसून आलें तेव्हां निराश होऊन तें एकदम सोडून दिलें. त्यावेळीं घडलेल्या चुका पुनः आपल्या हातून न घडूं देण्याविषयीं आपण सावधगिरी ठेविली पाहिजे. मी ज्या स्वदेशी चळवळीचा उपदेश करीत आहें तींत या गोष्टीबद्दल पूर्ण सावधगिरी ठेवण्यांत आली आहे. बहिष्कार द्वेषमूलक म्हणून त्याला मी पूर्वींपासूनच विरुद्ध आहें. माझ्या स्वदेशी चळवळींत त्याला केव्हांहि स्थान मिळावयाचें नाहीं. माझी प्रस्तुतची स्वदेशी चळवळ कोणतीहि राजकीय आपत्ति नाहींशी करण्यासाठीं सुरू करण्यांत आलेली नाहीं. रौलेट कायद्याच्या विरुद्ध चाललेल्या किंवा

इतर कोणत्याहि राजकीय चळवळीशीं तिचा संबंध नाहीं. अशा शुद्ध व केवळ स्वदेशप्रीतीच्या पायावर उभारलेल्या चळवळीला व्हाइसराय साहेबापासून तों शिपायापर्यंत सर्वांची सहानुभूतिच मिळेल अशी मला पूर्ण खात्री वाटते. माझी चळवळ केवळ देशाचें आर्थिक व धार्मिक हित व्हावें—लोकांना स्वावलंबी होण्यास शिकावें व कोणीहि निरुद्योगी राहू नये—अशा उद्देशानेंच काढण्यात आली आहे, आणि तिलाहि तूर्त मीं मर्यादित स्वरूप दिलें आहे. म्हणजे फक्त स्वदेशी कापड वापरण्यापुरती ती आहे. इतर जिनसांचा अंतर्भाव तिच्यात तूर्त मी करीत नाहीं. कापडापुरता जरी लोकांचा निश्चय पूर्णपणें पार पडला तरी देशाचा पैशाच्या दृष्टीनं पुष्कळ फायदा होईल. स्वतःजवळ कापडासंबधानें साधनाची सर्व अनुकूलता असतां दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्या समाजाला कोणीहि मूर्खच म्हणेल. दीडशें वर्षांपूर्वी साऱ्या हिंदुस्थानाला येथल्याच कापडाचा पुरवठा होऊन शिवाय परदेशातहि क्रोडो रुपयांचें कापड जात असे. पण आता दरसाल ६० कोट रुपयांचें कापड परदेशांतून हिंदुस्थानात येत आहे! आपण आपल्या पुरतें कापड हातमागावर काढून स्वतःची गरज भागविली तरी तूर्त पुरे आहे. शेतकरी वर्गाला वर्षांतून सहा महिने कांहीं काम नसतें. खेड्यापाड्यातले लोक काम न मिळाल्यामुळें अत्यंत निकृष्टावस्थेला पोंचले आहेत असें मीच म्हणतों असें नाहीं. डॉ. मॅन सारखे चौकस इंग्रज अधिकारी सुद्धां असेंच म्हणत आहेत. मीं स्वतः डोळ्यानीं

त्यांची दुर्दशा पाहिलेली आहे. अशा स्थितींत शेतकरी वर्गानें फावल्या वेळीं सूत काढण्याचा व हातमागावर कापड विणण्याचा धंदा केल्यास त्याला आपली उपजीविका चांगली करता येईल. शेतकरी वर्गालाच काय, पण इतर गरीब, कुलीन, अनाथ माणसांना व विशेषतः अनाथ विधवांना या कामाची माहिती करून दिल्यास त्यांच्याहि उपजीविकेची काळजी दूर होईल. गायकवाडी हद्दींतील विजापूर येथें श्रीमती रमाबेन यांच्या खटपटीनें तेथील ४०० स्त्रियांना आतां सूत कातण्याचें काम येऊं लागलें असून तेथील विधवा स्त्रियांना—विशेषतः गोषा तील मुसलमान स्त्रियांना—हे काम फार पसंत पडलें आहे. पुढाऱ्यांच्या खटपटीनें ही चळवळ सर्व देशभर पसरली तर हिंदुस्थानांतून कापडाचे पायीं परदेशांत जाणारे क्रोडो रुपये वाचतील.

तरुण—या चळवळीने देशाचें आर्थिक हित होईल ही गोष्ट मला आतां पूर्णपणे समजली, पण तिनें धार्मिक हितहि होईल असें आपण म्हणालां, त्याचा थोडासा स्पष्ट खुलासा आपण कृपा करून कराल तर बरें होईल.

महात्मा—धार्मिक हित होईल असें जें मी म्हटलें तें अशा रीतीनें होईल कीं 'दया धरमका मूल है' असें श्रीतुलसीदासजींचें वचन आहे. आपल्या देशांतल्या, आपल्या शेजारपाजारच्या, उपासमारीनें मरणाऱ्या हजारों देशबांधवांना या चळवळीनें काम मिळून त्यांचे प्राण वाचतील हें धर्मकृत्य

सामान्य आहे असें कोण म्हणेल? आमच्यातले कित्येक उदार धर्मात्मे धनिक गरिबाची दया मनात घेऊन एखादे दिवशी गोरगरीबाना बुंदीचे लाडू खाण्यास देतात. त्याना मी नावें ठेवीत नाहीं. कारण, त्यात त्याचा हेतु भूतदयेचा असतो. पण एखादे दिवशीं लाडू चारावयाचे, आणि बाकीच्या दिवशीं त्याची उपासमार होऊ द्यावयाची, त्यापेक्षा नेहमीच त्यांना ओलीकोरडी भाकर पोटभर खाण्याला मिळेल अशी कांहीं तजवीज केली तर तें केवढ मोठें धर्मकृत्य म्हणता येईल याचा विचार केला पाहिजे, आणि आपल्या धर्मादायाचा ओघ थोडासा पालटून गोरगरीबाना सूत कातण्याचे रहाट, चात्या, व हातमाग वगैरे पुरविण्यात त्या द्रव्याचा व्यय केला पाहिजे. हें निःसशय मोठें पुण्यकृत्य होईल.

**तरुण**--आपण म्हणता तशी स्वदेशी चळवळ केली असता ती देशाला हितकारक होईल असें दिसतें खरें. पण ही चळवळ कशा रीतीनें करावयाची त्याचा कांहीं मार्ग आपण दाखवाल काय?

**महात्मा**—पहिली गोष्ट करावयास पाहिजे ती ही कीं स्वदेशी चळवळीची इष्टता व शक्यता ज्यांच्या मनाला खरोखर पटली असेल व तिच्या संबंधाने कांहीं खटपट करणें हे आपलें कर्तव्य आहे असें मनापासून वाटत असेल त्यांनीं स्वदेशीव्रतपालनाविषयीं अशी शपथ घ्यावी कीं—

‘ईश्वराला साक्षी ठेवून मी प्रतिज्ञा करतों कीं आजपासून हिंदुस्थानांत राहत असतांना ज्यांतील कापूस, रेशीम किंवा

लोकर हिंदुस्थानात पैदा झालेली नाहीं, ज्यांतील सूत हिंदुस्थानात कातलेलें नाहीं, व जें हिंदी विणकरांनीं विणलेलें नाहीं अशा कापडाचा उपयोग मी करणार नाहीं, आणि हें व्रत मी आजन्म ( किंवा अमुक वर्षे पर्यंत ) पाळीन.

हें शुद्ध स्वदेशीव्रत ज्याना फार कडक व आपल्या हातून आचरलें जाण्यास कठीण वाटत असेल, त्यानीं सौम्य स्वरूपाची शपथ घ्यावी. ती अशी कीं—

'ईश्वराला स्मरून मी प्रतिज्ञा करतों कीं आजपासून हिंदुस्थानात राहत असताना हिंदुस्थानात विणलेलें नाहीं अशा कापडाचा उपयोग मी करणार नाहीं व हें व्रत मी आजन्म ( किंवा अमुक वर्षे पर्यंत ) पाळीन '

पाहिल्या प्रतीची म्हणजे शुद्ध स्वदेशी व्रताची शपथ घेणाराला त्या प्रतिज्ञेंत वर्णिल्याप्रमाणें अस्सल स्वदेशी कापड मिळण्यास प्रथम थोडी बहुत अडचण पडेल. तरी पण उमेद आहे कीं स्वदेशी आणि कला याच्याविषयीं पूर्ण प्रेम बाळगणारा मनुष्य स्वत: थोडी फार अडचण सोसून तशा प्रकारचें कापड उत्पन्न करण्यासाठीं सूत कातण्याचे रहाट व हातमाग याचा प्रचार करण्याचे कामीं झटून प्रयत्न करील तर लवकरच असा अस्सल स्वदेशी माल गरज भागविण्यापुरता लवकरच निघू लागेल.

**तरुण**—पण अस्सल किंवा मिश्र स्वदेशी व्रत धारण करणाराजवळ पूर्वीचे परदेशी कपडे असले तर त्यानें ते जाळून टाकावे असें आपलें म्हणणे आहे काय ?

महात्मा—एका काळीं माझ्या स्वदेशी व्रताची तीव्रता तितक्या पल्ल्याला गेली होती. पण विचाराअतीं ती मीं सोडून दिली आहे. कारण कीं, सध्याच्या वेळीं परदेशी कापडाचा नाश करण्यासारख्या सूचनेच्या मुळाशी असलेल्या शुद्ध हेतूचा विपर्यास होऊन तिला परकीयाच्या द्वेषाचें अनिष्ट स्वरूप प्राप्त होण्याची धास्ती वाटते. खऱ्या स्वदेशीच्या भक्ताला परकीयाचा द्वेष करणें हे पाप वाटत असताहि तें पाप उगीचच्या उगीच त्याच्या अंगाला चिकटविण्याचे प्रयत्न होऊन त्यापासून स्वदेशी चळवळीला विघ्नें येतील. यासाठीं अस्सल स्वदेशी व्रताची प्रतिज्ञा करणाराला स्वत. परदेशी कापडाचा उपयोग करता येणार नाहीं, पण त्यानें तें गोरगरिबाना देण्यास हरकत नाहीं. सध्याच्या स्थितींत अस्सल स्वदेशी व्रत घेणाराला पुष्कळ अडचणी सोसाव्या लागतील. इतक्या अडचणींना तोंड देण्याची हिंमत ज्याना वाटत नसेल त्याच्यासाठी मध्यम प्रतीचें मिश्र स्वदेशीचें व्रत ठेवण्यात आलें आहे. तेवढें त्यानीं प्रामाणिकपणें आचरलें तरी तूर्त पुष्कळ आहे. आपल्यापाशीं सध्या असलेल्या परदेशी कापडाचा त्याग करण्याची इच्छा अगर शक्ति ज्याना नसेल त्याच्यासाठीं तिसऱ्या प्रकारचें व्रत योजिलें आहे. हें व्रत घेणारा अशी प्रतिज्ञा करतो कीं—

'ईश्वराला साक्ष ठेवून मी शपथ घेतों कीं आजपासून स्वतःच्या वापराकरितां देशी अथवा परदेशी कापूस, रेशीम,

व लोकर यापासून हिंदुस्थानांत अगर परदेशीं कातलेल्या सुतापासून पण हिंदुस्थानांत विणलेलें असेंच कापड मी विकत घेईन; यापुढे भेट म्हणून मिळणाऱ्या किंवा दुसऱ्याच्या मालकीच्या परदेशी कापडाचा उपयोग मी करणार नाहीं.'

हें तिसऱ्या प्रतीचें व्रत घेणारा गृहस्थ शक्य तेवढा प्रयत्न करून योग्य वेळीं परदेशी कापडाचा त्याग करील व लग्न-कार्यादि मंगल प्रसंगीं व इतर धार्मिक वेळीं तरी केवळ स्वदेशीच कापडाचा उपयोग करील अशी आशा राखण्यांत येत आहे. या प्रमाणें प्रत्येकानें आपापल्या शक्त्यनुसार स्वदे-शीची शपथ घेतल्यानंतर घेतलेलें व्रत बिनचूक पाळण्याचा व इतर लोकांतहि स्वदेशीचा प्रचार करण्याचा यत्न करावा. त्याचप्रमाणें स्वदेशीव्रताचें पालन सुलभतेनें व्हावें म्हणून देशांत अस्सल स्वदेशी कापड ज्यास्त पैदा होईल अशी हर-एक प्रकारें तजवीज करणें हेंही त्यानें आपलें कर्तव्य समजावें. स्वदेशी व्रत घेणारानीं व्यक्तिशः व संघशः असे प्रयत्न के-ल्यास हें काम मोठेंसें अवघड आहे असें नाहीं. खरी कळ-कळ, आस्था, दीर्घोद्योग आणि *निश्चय* याच्या बळावर हें सहज साध्य करतां येईल असें मला वाटतें.'

याप्रमाणें तरुण गृहस्थ व महात्माजी यांच्यामध्यें हिंदुस्था-नविषयक निरनिराळ्या प्रश्नांसंबंधानें जो संवाद झाला त्याचा परिणाम त्या तरुणाच्या मनावर चांगला दृढ झालेला दिसला. त्याची निराशेची वृत्ति मावळली. हिंदुस्थानाला सध्या मोठी बिकट परिस्थिति प्राप्त झाली आहे आणि हिच्यातून त्याची

सुटका कशी होईल याविषयीं त्याच्या मनाला जी भ्रांति आसीत होती ती दूर झाली. अशा परिस्थितींत काय करावें आणि काय न करावें अशा पेंचांत सांपडून त्याचें चित्त बावरल्यासारखे झालें होतें. त्या त्याच्या चित्ताला आता शांति प्राप्त झाली. आपल्या कर्तव्याचा मार्ग आता त्याला स्पष्टपणें दिसू लागला. यामुळें त्याच्या चित्तवृत्ति उल्लसित होऊन तो उठला, आणि महात्माजीस साष्टांग नमस्कार घालून तो म्हणाला, ' महाराज, आपले माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत. निराशेच्या डोहात बुडणाऱ्या माझा उद्धार आपण केला आहे. माझ्या मनाला भ्रामक विचारानीं भलत्याच मार्गाकडे नेलें होतें. त्याला सन्मार्ग दाखवून देणारा दीपक आपला उपदेश झाला आहे. आपल्या उपदेशाचा प्रत्येक शब्द मीं आपल्या अंतःकरणात साठवून ठेविला आहे, त्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा माझ्या मनाचा दृढनिश्चय झाला आहे. त्या निश्चयाप्रमाणें वागण्याचें सामर्थ्य माझ्या ठायीं यावें म्हणून आपला आशिर्वाद मिळावा येवढी आतां माझी प्रार्थना आहे.

महात्माजींनीं त्या तरुणाकडे एकदा आपल्या तीक्ष्ण अंतर्भेदी दृष्टीनें पाहिलें तों खरोखरच त्या तरुणाची स्थिति त्यानें म्हटल्याप्रमाणें झालेली त्याना दिसून आली. तेव्हा त्यानीं प्रेमानें त्याला पोटाशीं धरून कुरवाळलें आणि म्हटलें ' तरुण मित्रा, जेथें सत्य आहे, धर्म आहे, आणि निष्ठा

आहे तेथे यशप्राप्ति ठेवलेलीच आहे समज. परमेश्वर तुझा हेतु सफळ करील. तुझ्या हातून या हिंदभूमीचा उद्धार होईल असा माझा तुला पूर्ण आशिर्वाद आहे. '

हा आशिर्वाद मिळताच तो तरुण आनंदानें उठला, आणि ' हा चाललों कर्तव्याचरणाला' असें म्हणून महात्माजींचा निरोप घेऊन जो निघाला, तो लवकरच दृष्टिपथाच्या पार झाला.

हा तरुण कोण असेल बरें? असा महात्माजी आपल्या मनाशीं तर्क करीत बसले होते. तों त्यांच्या विवेकबुद्धीनें त्यांच्या कानात सांगितले कीं, 'हा दुसरा कोणी नाहीं, मूर्तिमान् तरुण भारतच आहे.' तेव्हा महात्माजींच्याहि चित्तवृत्तीवर प्रसन्नता झळकली, आणि 'जय हिंद माता की जय' असे उद्गार त्याच्या तोंडून आपोआप बाहेर पडले. त्यानंतर महात्माजी आपल्या कार्याला निघून गेले.

RFLBK-0001632

वा. क्र. ९६३२